आयपीएल सामना क्र.२१

मुंबई इंडियन्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स

वेळ : सायं.३.३० वा.
स्थळ : वानखेडे स्टेडियम, मुंबई

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आयपीएल सामना क्र.२२

गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स

वेळ : सायं.७.३० वा.
स्थळ : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद

www.surajyadigital.com | रविवार, दि.१६ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १९७ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


# अदानी मोदींना संपवून टाकेल

## पुलवामा निवडणुकीसाठी घडवलं, बोलल्यानंतर गप्प बसण्यास सांगितलं : सत्यपाल मलिक

सुराज्य/मुंबई

'अदानी प्रकरणात मोदी सरकारचं खूप सारं नुकसान झालंय. हे नुकसान शेवटच्या स्तरापर्यंत झिरपलं आहे.२०२४मध्ये अदानी हा निवडणुकीचा मुद्दा होईल. यांनी जर वेळीच सुधारणा केली नाही तर अदानी यांना संपवून टाकेल. जर विरोधकांनी एका स एक उमेदवार दिला तर हे वाचूच शकणार नाहीत. इतक्या कमी जागा येतील की यावर विश्वासच बसणार नाही की यांचं सरकार कधीकाळी होतं.मोदी शांत राहून धोका ओढवून घेत आहेत. मला माहिती नाही की त्यांना कुणी सल्ला देतंय की नाही ते. मी त्यांना सल्ला देतोय की कृपा करून अदानी प्रकरणातून हात काढून घ्या. २० हजार कोटींच्या आरोपांचं उत्तर ते देऊ शकत नाहीत. लोकांचा यावर विश्वास बसू लागला आहे की अदानींच्या आर्थिक व्यवहारांमध्ये मोदींना रस आहे.' हे आरोप नसून उद्गार आहेत भाजपचे वरिष्ठ नेते आणि जम्मू व काश्मीरसह गोव्याचे राज्यपालपद भूषविलेले सत्यपाल मलिक यांचे. त्यांनी एका मुलाखतीत काश्मीरमधील ३७० कलम हटवण्यापासून पुलावामधील हल्ल्यापर्यंतच्या अनेक घटनांचा भांडाफोड केला आहे.

भाजप शासित राज्यांमधील पैसा अदानींकडे जात असावा; अशी शंका व्यक्त करताना मलिक यांनी सांगितले की 'यांचं सरकार असलेल्या राज्यांमध्ये भ्रष्टाचार चालू आहे. तिथला सगळा पैसा ते मुख्यमंत्री तर खात नाहीत.

तो इथेही येतो आहे. इथून तो पैसा कुठेतरी जात असावा. कदाचित तो पैसा अदानींकडे जात असावा अशी चर्चा लोक करत आहेत,' अशा शब्दात मोदी आणि अदानी यांच्यातील संबंधांवर सत्यपाल मलिक यांनी भाष्य केले आहे. 'संसदेत राहुल गांधींच्या एकाही प्रश्नाचे उत्तर पंतप्रधान नरेंद्र मोदी देऊ शकले नाहीत. त्यांना त्यांच्या बचावात एकही शब्द उच्चारता आले नाही. राहुल गांधींना बोलू न देणे फार चुकीची गोष्ट होती, नरेंद्र मोदी राहुल गांधींमुळे फार अस्वस्थ झाले आहेत. अदानींचा एकदम योग्य मुद्दा राहुल गांधींनी उचलला आहे.' असा शेराही या माजी राज्यपालांनी मारला आहे.



### मला हात लावला तर...

'मी हे बोललो त्याबद्दल काय करतील ते? माझा जीव घेऊ शकत नाहीत. माझा समाज खूप मोठा आहे, त्याला हात लावू शकत नाही, त्यांची दुर्दशा होईल. शेतकऱ्यांच्या मुद्द्यांवर मी बोलल्यामुळे माझ्यामागे एवढा पाठिंबा आहे की ज्या दिवशी मला हात लावतील, त्या दिवशी यांना कळून चुकेल. यांना कुठे जाहीर सभा घेता येणार नाही. मी फकीर माणूस आहे. भाड्याच्या घरात राहतो. मी तर राजकारणात येऊन बापजाद्यांचा जमीनजुमलाही विकून टाकला,' अशा शब्दात आपणास विरोध करणाऱ्यांचे काय होईल,हेसुध्दा मलिक यांनी सांगून टाकले आहे.

### मी बोललो तर म्हणाले शांत रहा

'काश्मीरच्या बाबतीत तर मला सक्त ताकीद दिली होती की काहीही बोलायचं नाही. गोव्यात तर मला एक दिवस फोन करून मला म्हणाले की तुम्ही जर काश्मीरबद्दल पुन्हा बोललात तर मी तुम्हाला पुन्हा कधीच नाही भेटणार. पुलवामा हल्ल्याच्या दिवशी सीआरपीएफने केंद्रीय गृहमंत्रालयाकडे एअरक्राफ्टची मागणी केली होती. पण त्यांनी नकार दिला. मी त्याच संध्याकाळी पंतप्रधानांना सांगितलं की पुलवामा आपल्या चुकीमुळे घडलंय. तर त्यांनी मला सांगितलं की तुम्ही आत्ता शांत राहा,' असे खुद्द पंतप्रधानांनीच बजावले असल्याचा गौप्यस्फोटही मलिक यांनी केला.

### ते आपल्याच धुंदीत

'पंतप्रधान नरेंद्र मोदींबाबत सगळ्या जगाचं जे मत आहे ते माझं नाही. मी त्यांना जेव्हा केव्हा भेटलो, तेव्हा मला जाणवलं की त्यांना अजिबात काही माहिती नाही.मी एकदा उदाहरण म्हणून सांगितलं की काश्मीरमधली खरी समस्या जमात आहे. त्यांना त्याची काही काळजीच नव्हती.जमात खूप शक्तिशाली आहे.पण मोदींना काहीच माहिती नाही. ते आपल्याच धुंदीत आहेत. मी दोन-तीन वेळा त्यांना सांगितलं की काश्मीरचा मुद्दा सुटू शकतो. पण ते त्यासाठी इच्छुक नव्हते,' असे भाष्यही मलिक यांनी काश्मीर प्रश्नावर केले.

## कसब्यातील प्रयोग इतरत्र यशस्वी होऊ देऊ नका

### चंद्रकांत पाटलांचा भाजप कार्यकर्त्यांना सल्ला

सुराज्य/पुणे

भाजपबद्दलची भीती हेच ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या पक्षांना एकत्र ठेवणारे फेव्हिकॉल आहे. कसबा मतदार संघात ते यशस्वी झाले असले तरी भविष्यातील राजकारणात त्यांचा हा प्रयोग यशस्वी होणार नाही, याची खूणगाठ मनाशी बांधा, असा सल्ला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी भाजप कार्यकर्त्यांना दिला.



शिरूर तालुका भाजपच्या वतीने न्हावरे फाटा (ता. शिरूर) येथील निसर्ग मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या भाजप कार्यकर्ता मेळाव्यात पाटील बोलत होते. या ते म्हणाले की, आगामी लोकसभा, विधानसभेपासून जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका व बाजार समिती या सर्वच निवडणूकांत भाजपच्या वाढत्या सामर्थ्याला घाबरून महाविकास आघाडीतील तीन्ही पक्ष एकत्र येणार आहेत, हे गृहित धरून आत्तापासून सुक्ष्म नियोजन करावे. पक्षीय विचारधारा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व हे शिरोधार्य तर आहेच. पण केंद्र व राज्यात असलेल्या सत्तेच्या माध्यमातून समाजापर्यंत ठोकून विकासाची कामे आणा आणि सामान्य लोकांना पक्षाशी जोडून विकासकामांच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाची 'व्होटबँक' मजबूत करा, असे आवाहनही त्यांनी केले.

## दारूच्या नशेत वृध्दाने ॲसिड पिले

सोलापूर : दारूच्या नशेत वृध्दाने बाटलीत ठेवलेले सिड पिल्याने वृध्दाला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. कन्नक पद्मनाभन अय्यर (वय ६८, रा. उत्तर सदर बाझार) असे रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या वृध्दाचे नाव आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## शासनाच्यावतीने राज्यात २ दिवसांची टोलमाफी

मुंबई : ज्येष्ठ समाजसेवक आणि निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र भूषण' पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोहळा येत्या १६ एप्रिल रोजी नवी मुंबईतील खारघर येथील सेंट्रल पार्क मैदानावर पार पडणार आहे.

या सोहळ्याला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह देखील उपस्थिती लावणार आहेत. मात्र, मुंबईतून येणाऱ्या आणि जाणाऱ्या वाहनांसाठी राज्यात २ दिवसांची टोलमाफी देण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रादेशिक विभाग आणि सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांच्या माध्यमातून घेण्यात आला आहे.



या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रवास करणाऱ्या सर्व टोल नाक्यांवर १५ एप्रिल (रात्री १२ वा.) आणि १६ एप्रिल (रात्री ११.५९वाजेपर्यंत) या दिवसाकरिता खारघर, नवी मुंबईच्या दिशेने येणाऱ्या वाहनांपैकी पुरस्कार वितरण सोहळ्याकरीता येऊ इच्छिणाऱ्या अनुयायी आणि अन्य निमंत्रितांच्या वाहनांना टोलमाफी करावी. तसेच संबंधित ठेकेदारांना याबाबत आपल्या स्तरावरून आदेश देण्यात यावे, अशा सूचना महाराष्ट्र शासनाकडून देण्यात आल्या आहेत.

## बारलोणीत भरदिवसा घरफोडी; दागिन्यांसह पाच लाखांचा ऐवज लंपास

सोलापूर : दिवसा ढवळ्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी रोख रक्कम व सोन्याच्या दागिन्यांसह जवळपास पाच लाखांचा ऐवज चोरून नेला. ही घटना बारलोणी (ता. माढा) येथे घडली. याबाबत अभिमान गजराव मोरे (रा.बारलोणी ता.माढा) यांनी फिर्याद दिली आहे.

मोरे यांची काशीद वस्ती आणि बारलोणीत घराशेजारी अशा दोन ठिकाणी शेती आहे. सकाळी ८ वाजता अभिमान मोरे आणि त्यांची पत्नी शारदा व मुलगा सुमीत हे तिघेजण काशीद वस्ती येथील शेतात उसाची लागण चालू असल्याने तिथे गेले होते. अभिमान यांच्या आई पार्वती या घराशेजारील शेतात खुरपणीसाठी आलेल्या महिला मजुरांसोबत होत्या. मात्र, घरी कोणीच नसल्याने कुलप लावले होते. दरम्यान कामाला लावलेल्या महिलांची जेवणाची सुट्टी झाल्यानंतर अभिमान यांच्या आई घराकडे आल्या असता त्यांना दोन्ही घराची कुलूपे तोडलेली दिसली. हे पाहून आईने दुपारी अभिमान यांना फोन करुन याची माहिती दिली. ते आले असता त्यांना चोरी झाल्याचे लक्षा आले. चोरट्याने रोख १ लाख १५ हजार, १ लाख ६० हजार रुपये किमतीचे चार तोळे सोन्याच्या बांगड्या, १ लाख २० हजारांचे तीन सोन्याचे लॉकेट, ८० हजारांचे दोन तोळे सोन्याचे गंठण, पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असे एकूण ४ लाख ९५ हजार रुपयांचे ऐवज लंपास केला.



स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.विशाल हिरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. तपास पोलीस निरीक्षक गोपाळ पवार करीत आहेत.

## अक्कलकोट, मोहोळ, मंगळवेढ्यात लम्पीबाधित पशुधन वाढले

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात कोरोनाचे संकट पुन्हा येत असताना लम्पीने जनावरांवर तीन तालुक्यांमध्ये धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली आहे. अक्कलकोट, मोहोळ व मंगळवेढा या तीन तालुक्यात ३८६ पशुधन बाधित आढळून आले आहेत.

लम्पीने सुरुवातीच्या टप्प्यात माळशिरस, सांगोला व करमाळा या तीन तालुक्यांमध्ये धुमाकूळ घातला होता. आता या तालुक्यांमधील लम्पी आटोक्यात



आला आहे. जिल्ह्यात सध्या लम्पीचे ६७७ ॲक्टिव बाधित पशुधन आहे. सर्वाधिक १५४ लम्पी बाधित पशुधन मोहोळ तालुक्यात आहे. त्या खालोखाल मंगळवेढा तालुक्यात १४० तर अक्कलकोट तालुक्यात ९२ लम्पीबाधित पशुधन आहे. जिल्ह्यातील ३९ हजार ५७० पशुधनाला लम्पीची लागण झाली होती. त्यापैकी ३५ हजार २३५ पशुधन सध्या लम्पीमुक्त झाले आहे. लम्पीमुळे जिल्ह्यातील ३ हजार ६८५ पशुधनाचा मृत्यू झाला आहे. सर्वाधिक १ हजार ३१२ मृत्यू माळशिरस तालुक्यात झाले आहेत. अक्कलकोट तालुक्यात ६०, मोहोळ तालुक्यात २१७ तर मंगळवेढा तालुक्यातील २०१ जनावरांचा आतापर्यंत लम्पीमुळे मृत्यू झाला आहे. अनुदान वाटपाचे ४५२ प्रस्ताव सध्या प्रलंबित आहेत.

## पैसे उकळणाऱ्या तोतया पोलिसास अटक

सोलापूर : करकंब-पंढरपूर मार्गावर थांबून पोलिस असल्याचा बहाणा करून वाहन चालकांना दमबाजी करत पैसे उकळणारा तोतया पोलीस समाधान गोरख मढे (रा. शिर्डी, जि. अहमदनगर) याच्यावर करकंब पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

समाधान मढे याने प्रकाश बनकर (रा. करकंब) यांची १४ एप्रिल रोजी सायंकाळी बार्डीपाटी येथे मोटारसायकल अडवली. त्यांच्याकडे लायसन्स व गाडीची कागदपत्रे मागितली. त्यांना दम देत पैसे काढा, अन्यथा तुम्हाला दंड भरावा लागेल अशी दमबाजी केली. तुझ्या गाडीला नंबर नाही म्हणत त्याने जबरदस्तीने बनकर यांच्या शर्ट व पॅन्टचा खिसा जबरदस्तीने तपासून चोरीचा प्रयत्न केला. त्यानंतर बनकर यांनी ट्रॅफिकचे हवालदार विजय गोरवे व शिपाई सुर्वे यांच्या कानावर ही बाब घातली. दोघांनी त्याचा पठलाग करून गाडीसहित पकडले. त्याच्यावर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



डॉक्टर, रात्री अपरात्री हे पाणी आलं.. पाणी आलं.. असं म्हणत जागे होतात !


कल्याण
300-35-780


## साडेतीन लाख कुटुंबांना मिळाला 'आनंदाचा शिधा'

### डॉ.आंबेडकर जयंती झाली गोड

सुराज्य/सोलापूर

**गुढीपाडवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव आनंदाने साजरा करण्यासाठी शासनाच्या पुरवठा विभागाने 'आनंदाचा शिधा' देण्याची घोषणा केली होती. डॉ. आंबेडकर जयंती महोत्सव शहर जिल्ह्यामध्ये आनंदाने साजरा होत असताना शहर जिल्ह्यातील तब्बल साडेतीन लाख लाभार्थ्यांना 'आनंदाचा शिधा' मिळाल्याने डॉ. आंबेडकर जयंतीचा गोडवा वाढला आहे.**

शासनाकडून नेमण्यात आलेल्या ठेकेदारांनी वेळेत साहित्याचा पुरवठा केला नाही. त्यामुळे गुढीपाडवा आनंदाविनाच साजरा झाला. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तातडीने 'आनंदाचा शिधा' वाटपाचे नियोजन केले. दोन दिवसांपूर्वी अक्कलकोट दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूर तालुक्यात काही दुकानदारांना कीट मिळाले नव्हते. १२ एप्रिल रोजी कमी असलेला रवा देखील दाखल झाल्याने ग्रामीण भागात आता पर्यंत ९२ टक्के वाटप देखील केल्याची माहिती पुरवठा विभागाच्या देण्यात आली. आजअखेर ३ लाख ८९ हजार ३६२ कार्डधारकांना २ लाख ४३ हजार २२ कीटचे वाटप केले आहे. तर शहरातील परिस्थिती देखील वाटपामध्ये चांगली आहे. ९५ टक्के वाटप



झाले आहे. आजअखेर १ लाख १७ हजार ४४२ कार्डधारकांना ८१ हजार ६५३ कीट वाटप झाले आहे. जिल्ह्यासाठी एकूण ३ लाख ७० हजार ४२१ कुटुंबांसाठी कीट लागणार होते. पहिल्या टप्प्यामध्ये २ लाख १२ हजार १५९ कीट जिल्हा पुरवठा विभागाकडून रेशन दुकानांवर उपलब्ध करून देण्यात आले होते. १२ एप्रिल रोजी सर्व कीट आणि रवा दाखल झाल्याने एकत्रित वाहतूक करून सर्व कीट रेशन दुकानदारांमध्ये दाखल झाल्याने जवळपास सर्व कीटचे वाटप झाल्याची माहिती पुरवठा विभागाच्या वतीने देण्यात आली.

**ग्रामीण भागातील चार तालुक्यात कीट पोहचले नव्हते. मात्र रवा आणि कीट दाखल झाल्याने वेळेत नियोजन करून आनंदाचा शिधाचे कीट आता पोहचवले आहे. ग्रामीण भागात जवळपास ९२ टक्के कीटचे वाटप झाले आहे.**

**– वर्षा लांडगे (जिल्हापुरवठा अधिकारी)**

**आनंदाच्या शिधाचे कीट सर्व दुकानदारांना प्राप्त झाल्याने सर्वत्र सुरळीत वाटप चालू आहे. जवळपास ९० टक्के वाटप झाले आहे. ज्या कार्डधारकांनी लाभ घेतला नाही त्यांनी लवकर आनंदाचा शिधाचे किट घेऊन जावे.**


**– नितीन पेंटर (जिल्हा संपर्क प्रमुख)**

# ‘हिमोफिलिया’वर व्यापक जनजागृतीची गरज

**उद्या सोमवार दि.१७ एप्रिल रोजी जागतिक हिमोफिलिया दिन जगभर साजरा केला जात आहे, त्यानिमित्त या आजाराविषयी जनजागृती म्हणून ही लेखमाला...**




सिकलसेल हिमोफिलिया आणि थॅलेसिमिया हे रक्त विकारातील तीन आजार. त्यापैकी हिमोफिलिया हा एक दुर्मिळ आणि अनुवंशिक आजार मानला जातो. या आजाराच्या इतिहासात डोकावल्यास अगदी सोळाव्या शतकापासून त्याची नोंद आढळते. यावर त्याकाळापासून अगदी सन २०१५ पर्यंत जगाच्या पाठीवर उपचार नव्हते. उपाय आणि औषधही नव्हते. तेव्हा या काळातील रूग्णांनी आपले आयुष्य कसे जगले असतील हा विचार केल्यास तो कल्पनेच्या बाहेरचा ठरेल. आता या आजारावर संशोधन सुरू असून वैद्यकीय क्षेत्राने काही उपाय शोधले आहेत. त्यामुळे आजच्या पिढीला या आजाराला प्रतिबंध करण्याचा एक उपाय हाती आला आहे, असे म्हणावे लागेल. हा आजार कायमचा नष्ट होणार नाही. जगाच्या पाठीवर कुठेही जा. औषध नाही.आम्ही तुम्हाला बरे करू शकत नाही,असे डॉक्टरांकडून हेच उत्तर ऐकायला मिळेल. माणसाच्या रक्तात तेरा प्रकारचे घटक असतात. एट, नाईन व एलेवन हे घटक ज्यांच्या रक्तात कमी असतात त्यांना हिमोफिलियाचा आजार जडतो. त्याला व्याधीही म्हणतात. शरिरावर अतिताण घेतल्यास, कष्टाची कामे केल्यास, धावपळ केल्यास शरीराच्या सांध्यांमध्ये (खांदा,हाताचे कोपरे,गुडघे,घोटे व बोटांचे सांधे) रक्त साकाळते. रक्त साकाळल्यानंतर त्याठिकाणी मोठी सूज येते. सूज जिथे येते,त्या सांध्यांमधील रक्तवाहिन्यांवर ताण आला की वेदना व्हायला लागतात. ह्या वेदना म्हणजे एकप्रकारे मरण यातनाच. उठता येत नाही वा झोपता येत नाही, अशी या रूग्णांची या स्थितीतील अवस्था असते. गुडघ्यातील, हाताच्या कोपऱ्यातील व खांद्यातील सूज आठ ते दहा दिवस कमी होत नाही. सूज उतरून पुन्हा रक्ताभिसरण होण्यासाठी सृष्टीची कृपा लागते अन्यथा ह्या यातना सहन करत राहाणे हा एकच उपाय असतो. शरिरांतर्गत होणाऱ्या या क्रियेला जॉईंटस ब्लिडिंग म्हटले जाते. त्यात हिमोफिलियामधील एक मोठा धोका म्हणजे रक्तस्त्राव (बिल्डींग). हिमोफिलिया बाधित रूग्ण पडून जखमी झाल्यास किंवा हाताला पायाला ब्लेड किंवा इतर शस्त्र लागल्यास रक्तस्त्राव थांबत नाही तसेच पडल्यानंतर अथवा मोठा धक्का लागल्यानंतर नाकातून,पोटातून व मेंदूतून रक्तस्त्राव होण्याचा धोका असू शकतो. अतिरक्तस्त्राव झाल्यास जीवाला धोका उद्‌भवू शकतो. हिरड्यांमधूनही ब्लिडिंगचा धोका असतो. या रूग्णांमध्ये रक्तस्त्राव लवकर थांबत नाही,हाच तो धोका. या आजारात केंद्र सरकारच्या आरोग्य खात्याने तीन विभाग केले आहेत. ‘ए’ विभागात तीव्र हिमोफिलिया, ‘बी’मध्ये मध्यम तर ‘सी’मध्ये कम हिमोफिलिया. असे हे तीन विभाग. बी आणि सीमधील रूग्ण नशिबवान असतात, असे डॉक्टर म्हणतात. कारण या सेक्शनमधील रूग्ण फिरू शकतात.जग पाहू शकतात. ‘ए’मधील रूग्णांची अवस्था भयानक सांगितली जाते. या विभागातील रूग्णांना आपोआप मेंदूतून, पोटातून किंवा युरिनमधून रक्तस्त्राव होण्याचा धोका असतो.



जगाचा विचार करता बी विभागातील रूग्णांची संख्या अधिक आहे. ए विभागाचा समावेश एट फॅक्टर, बीवाल्यांचा समावेश नाईन फॅक्टरमध्ये तर एलेवननध्ये सी कॅटेगिरीतील रूग्णांचा समावेश करण्यात आल्याचे सांगण्यात येते. आज वैद्यकीय क्षेत्रात यावर संशोधन करून काही उपाय आणले आहेत. नाईन फॅक्टर हा घटक उपलब्ध होवू शकतो. तो नाही मिळाला तर प्लाझमा किंवा क्रायो हा एक उपाय आहे. संबधित रूग्णाचा ब्लडग्रूप पाहून हा फॅक्टर ब्लड बँकांमधून उपलब्ध होवू शकतो. शरिराबाहेर किंवा जॉईंटस् ब्लिडिंगमुळे शरिरातील रक्त कमी झाल्यास अशा रूग्णांना बाहेरून रक्त द्यावे लागते. मायबाप सरकार अशा रूग्णांसाठी मोफत रक्त देण्याची सूचना केली आहे. विशेष म्हणजे नाईन फॅक्टरच्या इंजेक्शनची किंमत बाहेर प्रचंड आहे. तीही वेळेवर मिळत नाही. पण मोदी सरकारने या इंजेक्शनचे दर कमी करून या रूग्णांना दिलासा दिला आहे. रक्तस्त्राव थांबवण्यासाठी पॉझ या गोळ्यांचा उपयोग केला जातो.व्हीटॅमिनच्या गोळ्याही उपलब्ध असतात. सांगण्याचे तात्पर्य हेच की, हिमोफिलिया रूग्णांची अवस्था आज काही अंशी बरी म्हणावी लागेल. आज याच्यावर व्यापक जनजागृती होण्याची गरज आहे तसेच केंद्र आणि राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मीडियाने एक मोहीम हाती घ्यावी, अशी यानिमित्ताने एक अपेक्षा आहे. भारतात आणि प्रत्येक राज्यांमध्ये किती रूग्ण आहेत,याची संख्या ना सरकारकडे,ना डॉक्टरांकडे ना एजजीओंकडे नाहीय. अलिकडच्या चार- वर्षांपासून प्रादेशिक दैनिकांमधून हिमोफिलियावर लेख येतायेत पण त्यात केवळ शास्त्रीय माहिती दिली जात असते. त्याच्या पलिकडे जावून पत्रकारांनी त्यांच्या समस्या मांडण्याची गरज आहे. हा आजार-व्याधी आईकडून (फिमेल) येतो. फिमेल ही हिमोफिलिक असते. तिला हिमोफिलिया वाहक (कॅरिअर)म्हटले जाते. तिला त्रास नसतो पण तिच्या पोटी मुलगा जन्माला आला तर त्याच्यात हिमोफिलिया उतरतो,असे रक्तविकारतज्ज्ञांकडून (हेमॅटॉलाजिस्ट) सांगितले जाते. आईच्या पूर्वजांना ही व्याधी असते,असा रक्तविकारतज्ञांचा अनुमान आहे. समजा हिमोफिलिक फिमेलला दोन किंवा तीन मुले असतील तर कोणत्या मुलामध्ये हिमोफिलिया उतरू शकतो? या प्रश्नाचे उत्तर रक्तविकारतज्ञ देवू शकत नाहीत. एकात किंवा तिघांमध्येही येवू शकतो. हे सर्वकाही सृष्टीवर अवलंबून आहे. चार वर्षांपूर्वी डीडी न्यूजवर हिमोफिलियावर एक कार्यक्रम होता. त्यात दोघे मेडिसिनचे व एक डॉक्टर हेमॅटॉलॉजिस्ट होते. हा आजार अनुवंशिक जरी असला तरी यात न्यू हिस्ट्री होवू शकते. म्हणजेच लग्न झालेल्या दाम्पत्यातील जीन्स प्रॉब्लेम्समधून त्यांच्यातील मुलाला हिमोफिलिया होवू शकतो, असे त्या हेमॅटॉलिजिस्ट डॉक्टरांनी सांगितले. हा आजार सातव्या किंवा आठव्या वर्षी ट्रेस होतो. त्यामुळे मुलगा किंवा मुलींचे हे वय झाल्यानंतर त्यांची रक्ततपासणी करून घेण्याची आवश्यकता आहे. याविषयी पत्रकारांनी जनजागृतीची मोहिम हाती घ्यावी, अशी अपेक्षा आहे. मुलींना हा आजार सहसा जडत नाही पण लाखातून एखादीला तो येवू शकतो. लहानवयात हा आजार प्रचंड त्रास देत असतो. त्यामुळे अशा मुलांना मानसिक आधार देवून त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपावे लागते. हे कर्तव्य आई-वडिलांचे,बहिण-भावाचे असते. हिमोफिलिया बारा तास अगोदर इंटिमेशन देत असतो. संबंधित रूग्णांच्या जाईंटमध्ये कळ यायला लागते. दुखायला लागते. त्याने लगेच घरी थांबून रहावे. डॉक्टरांकडे जावून लागलीच गोळ्या आणाव्यात. आज मेडिकलमध्ये सॉफ्ट बँडेज उपलब्ध असतात. वेळीच हाताच्या कोपऱ्यांना ती वेळीच लपेटल्यास रक्त साकाळून सूज येणार नाही. गुडघे व घोट्यांसाठीही बॅंडेज मिळतात. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्या वापरल्यास वेदना कमी होतील. असा त्रास सुरू झाल्यानंतर त्या रूग्णाजवळ कुणी बसू नये.त्याचे हात अगर पाय ओढण्याचा प्रयत्न करू नये. त्याच्याशी शारिरीक थट्टा-मस्करी करता कामा नये. रक्तस्त्राव होत राहिल्यास लागलीच हॉस्पिटलमध्ये जायला हवे.या आजाराला सांधेदुखीचा आजार समजू नये.हा एक गैरसमज आहे. या सर्व समस्यांवर प्रबोधन होण्याची आवश्यकता आहे. देशात आणि राज्याराज्यांमध्ये हिमोफिलिया रूग्णांची संख्या किती आहे, याची आकडेवारी देखील उपलब्ध नाही. अंदाजे सांगितली जाते. याविषयी सरकार व एनजीओंना जाग आणण्यासाठी पत्रकारांनी यात लक्ष घालण्याची गरज आहे.

**पुरुषोत्तम कुलकर्णी**
**7822854654**

**या आजाराने त्रस्त असलेल्या व्यक्तींनी जीवन कसे जगावे? त्यांचे भवितव्य काय? केंद्र आणि राज्य सरकारे त्यांच्याबाबतीत डोळे उघडून काम करणार की नाही? या रूग्णांनी हिमोफिलियाविरूद्ध लढण्यासाठी काय केले पाहिजे? याविषयीचे विवेचन उद्याच्या अंकात.**



## डिकसळ येथे डॉ.आंबेडकर यांची जयंती साजरी

**सांगोला** : सांगोला तालुक्यातील डिकसळ गावात म.फुले आंबेडकर सार्वजनिक वाचनालय डिकसळ या वाचनालयाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी मा.सरपंच चंद्रकांत कारंडे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी बाळू भुसनर, पिराजी वाघमोडे, श्रीकांत गंगणे, सुभाष गंगणे, तानाजी गंगणे, भाऊसाहेब गेजगे, संजय कांबळे विशाल गंगणे,विकास गंगणे, अजित गंगणे, बाबासो कोरे, मितेश गेजगे इतर मान्यवर उपस्थित होते.

## रेल्वे स्कॉट मेमोरियल क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन

**सोलापूर** : मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर व विभागीय स्पोर्ट्स असोसिएशन मध्य रेल्वे सोलापूर यांच्यावतीने आयोजित प्रिसीजन पुरस्कृत ७६व्या रेल्वे स्कॉट मेमोरियल क्रिकेट स्पर्धेच्या ४० षटकाच्या अ गटाचे स्पर्धेचे उद्‌घाटन सोलापूर जिल्ह्याचे वरिष्ठ क्रिकेटपटू सुनील मालप व सोलापूरचे उद्योगपती अनिरुद्ध होमकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मालप व होमकर परिवाराने पुरस्कृत केलेल्या ५ फूट ८ इंच उंचीच्या भव्य ट्रॉफीचे व मैदानाचे पूजन करुन करण्यात आले. याप्रसंगी मध्य रेल्वेचे सचिव किशोर पिल्ले, खजिनदार विक्रांत पवार, वासु दोरनाल, अंबादास तोरा, वैभव इराबत्ती, व्ही. एम. पाटील, विक्रांत माने, अतुल बांदवडीकर, प्रदीप गोरे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन सुदेश मालप तर आभार राजा पटेल यांनी मानले.

## आशा विद्यालयात चवडेकर यांचा सत्कार

**सोलापूर** : नीलम नगर भाग ३ व ४ येथील आशा मराठी विद्यालयातील चवडेकर कालिदास नारायण यांचा सेवानिवृत्त कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थाध्यक्ष हारुन पठाण या होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डायरेक्टर डीडीआर श्रीकांत मोरे, निवृत्त उपसंचालक पुणे प्रदीप मोरे, राज्याध्यक्ष काव्यप्रेमी शिक्षकमंच आनंद घोडके, रोटरी क्लब माजी अध्यक्ष कालिदास माणेकरी, माजी उपमहापौर नसीमा पठाण, संस्थेच्या सचिवा शेख मुमताज, आशा मराठी विद्यालयाचे मुख्याध्यापिका तस्लीमबानो पठाण, प्रशालेच्या मुख्याध्यापिका सय्यद आफरीन उपस्थित होते.

## प्रबुद्ध भारत तरुण मंडळातर्फे आंबेडकरांना अभिवादन

**सोलापूर** : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त प्रबुद्ध भारत तरुण मंडळ(पी.बी. ग्रुप) आणि बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती मध्यवर्ती मंडळातर्फे अभिवादन करण्यात आले. पी.बी.ग्रुपतर्फे श्रीमंत जाधव यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मध्यवर्ती मंडळातर्फे माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, बाळासाहेब वाघमारे यांनी अभिवादन केले. यावेळी अध्यक्ष अमित बनसोडे, कार्याध्यक्ष आदित्य चंदनशिवे, सचिव महेश शिंदे, अविनाश भडकुंबे, आरोग्य निरीक्षक विजय साळुंखे, प्रतीक चंदनशिवे, गौतम शिंदे, रोहित वाघमारे, गौतम शिंदे, रोहित वाघमारे, साईनाथ मस्के, राहुल माळाळे आदी उपस्थित होते.

## पुतण्याकडून काका-काकूला मारहाण

**सोलापूर** : पैसे मागितल्याचा राग मनात धरून पुतण्याने काका काकूला मारहाण केली. संजय धर्मा पवार (वय-५०,रा.कुमठा तांडा) हे त्यांच्या घरासमोर वेल्डिंगचे काम करत असतानात्यांचा पुतण्या मंथन देविदास पवार (रा.कुमठा तांडा) याने काका संजय पवार यांना शिवीगाळ केली. मंथन पवार याने हातातील लोखंडी रॉड काकाच्या डोक्यात मारून जखमी केले.त्यानंतर संजय यांची पत्नी भांडण सोडविण्यासाठी मध्ये आले असता त्यांच्या हातावर देखील लोखंडी रॉडने मारून जखमी केले व पुन्हा पैसे मागितल्यास तुला खल्लास करील अशी धमकी दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पुतण्या मंथन पवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## अंगणवाडी पर्यवेक्षिका, बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना कायद्याचे प्रशिक्षण देणार : स्वामी

**सुराज्य/सोलापूर**



राज्यासह जिल्ह्यात मुलींचा जन्मदर कमी होत चालला आहे. यावर प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हा परिषद प्रयत्न करत आहे. याचाच एक भाग म्हणून जिल्ह्यातील ९६ अंगणवाडी पर्यवेक्षिका, १० बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना पीसीपीएनडीटी कायद्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत महिला व बालकल्याण विभागाची बैठक झाली. या बैठकीस जिल्ह्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी व अंगणवाडी पर्यवेक्षिका उपस्थित होत्या. यावेळी पोषण अभियान, बालमृत्यू, बेटी बचाओ बेटी पढाओ, पोषण पंधरवडा आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. पीसीपीएनडीटी या कायद्याची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी व अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना कायद्याचे ज्ञान असणे आवश्यक असून, याबाबत जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. राज्याच्या तुलनेत जिल्ह्यामध्ये बालविवाहाचे प्रमाण जास्त असून, हे प्रमाण कमी करण्याबाबत अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका यांची महत्त्वाची भूमिका आहे, असे स्वामी म्हणाले.

जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बालविकास जावेद शेख अंगणवाडी समायोजन व पोषण अभियानांतर्गत पोषण ट्रॅकर निदर्शांक असणारे आधार व्हेरिफिकेशन, वजन मापन नोंदणी, अंगणवाडी डेली मॉनिटरिंग आदी बाबींचा विभागनिहाय सविस्तर आढावा घेतला. ज्या विभागांचे कामकाज जिल्ह्याच्या तुलनेत कमी आहे, त्या विभागांनी कॅम्प मोडवर नोंदणी करून सर्व निर्देशांकांमध्ये सुधारणा करण्याबाबत स्वामी यांनी सूचना दिल्या.

> मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी अंगणवाडी पर्यवेक्षिकांची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे त्यांना पीसीपीएनडीटी कायद्याची माहिती असणे आवश्यक आहे. त्या त्यांच्या कार्यक्षेत्रात कायद्याबाबत जनजागृती करतील. मुलींच्या जन्मसंख्येवर लक्षही ठेवतील, जिल्हा कार्यक्रम अधिकार जावेद शेख यांनी सांगितले.



## करजगी यांना डॉक्टरेट पदवी बहाल

**सोलापूर** : कामगार नेते कुमार करजगी यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी कॅलिफोर्निया पब्लिक युनिव्हर्सिटी कडून ‘डॉक्टरेट’ ही पदवी बहाल करण्यात आली.

करजगी यांच्या कार्याची दखल अमेरिकेतील नंबर एकचे विद्यापीठ समजले जाणाऱ्या कॅलिफोर्निया पब्लिक युनिव्हर्सिटी ने घेतली व त्यांना त्यांच्या कार्यानिमित्त’ ‘डॉक्टरेट’ ही पदवी दिली. हॉटेल ताज दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात कदिर शाह, ऍम्बसी द इस्लामिक रिपब्लिक ऑफ अफगाणिस्तान, झेना चुंग, डायरेक्टर, डिप्लोमॅटस फोरम, कोरिया, डॉ.गौरव गुप्ता फाउंडर प्रेसिडेंट, ग्लोबल ट्रेड कौन्सिल, डॉ. अंजेय डीन-रिसर्च, कॅलिफोर्निया पब्लिक युनिव्हर्सिटी, डेलेव्हर युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका, प्रोफेसर डॉ.के एस राणा व्हाईस चान्सलर मेवार युनिव्हर्सिटी, डॉ. अबेद अल रझेग अबू जाझेर, मीडिया ऍडव्हाझर ऍम्बसी ऑफ पॅलेस्टिने, डिप्लोमॅट केनिया हाय कमिशन, के एल गंजु यांच्या उपस्थिती मध्ये करजगी यांना पदवी बहाल करण्यात आली.

## सेवा सदन संस्थेतर्फे बुधवारपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन

**सोलापूर** : सेवासदन संस्थेच्या शताब्दी वर्षाच्या तीन दिवसीय सांगता समारंभास बुधवारपासून हुतात्मा स्मृती मंदिरात प्रारंभ होणार असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा प्रा. शीला मिस्त्री यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी विविध कार्यक्रम होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. १९ रोजी सकाळी ९ वाजता राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे महाराज यांचे ’स्त्री शिक्षण’ या विषयावर कीर्तन होणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता गीतवसंत हा विलास कुलकर्णी व प्राजक्ता देशपांडे यांचा सुगम संगीताचा कार्यक्रम होईल. गुरूवारी २० स्त्रियांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान’ या विषयावर सायंकाळी ५ वाजता परिसंवाद होणार आहे. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुहासिनी शहा असतील. तर यात आ. प्रणिती शिंदे, मृणालिनी जोशी - कानिटकर, नेहा बेलसरे वक्त्या म्हणून सहभागी होणार आहेत. शुक्रवारी २१ रोजी सायंकाळी ५ वाजता सांगता समारंभ खा. डॉ जयसिद्धेश्वर महास्वामी आणि पुणे सेवासदन संस्थेच्या अध्यक्षा वर्षा परांजपे यांच्या विशेष उपस्थितीत होणार आहे. अध्यक्षस्थान ज्ञानप्रबोधिनी पुणेचे अध्यक्ष डॉ. गिरीश बापट भूषवणार आहेत. यानंतर विविध गुणदर्शनाचाही कार्यक्रम सादर होणार आहे. हे सर्व कार्यक्रम खुले असून या सर्व कार्यक्रमांना सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस सेवासदन संस्थेच्या सचिवा प्रा. वीणा पतकी, संचालक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. राजीव प्रधान उपस्थित होते.

## बसवेश्वर जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन

**सुराज्य/सोलापूर**



श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने दिनांक १७ ते २२ एप्रिल दरम्यान बसव सप्ताहाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती ट्रस्टी जगदीश पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली

१७ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे बसवरत्न पुरस्काराचे वितरण होणार आहे. या पुरस्कारामध्ये विविध क्षेत्रांमध्ये कार्य करणाऱ्या पाच महिला व पाच पुरुष यांना बसवरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. २० एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता मल्लिकार्जुन मंदिर बाळीवेस येथे महात्मा बसवेश्वर महाराज मूर्ती प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास मनपा आयुक्त शितल तेली-उगले, शमा पवार, वैशाली कडूकर, इंदुमती अलगोंडा-पाटील व समाजातील विविध महिला उपस्थित राहणार आहेत. २१ एप्रिल रोजी सकाळी दहा ते दोन अव्वरमट मल्लिकार्जुन मंदिर बाळीवेस येथे मोफत सर्व रोग निदान शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी सहा वाजता बसव पाळणा कार्यक्रम होणार आहे. दि. २२ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजता महात्मा बसवेश्वर अश्वारूढ पुतळ्यास रुद्राभिषेक होणार आहे तर सायंकाळी पाच वाजता श्री. मल्लिकार्जुन मंदिर बाळीवेस येथून श्री. महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती निमित्त भव्य मिरवणूक निघणार आहे. बसवेश्वर जयंती दिनी मनपा प्रसती गृहामध्ये जन्मास येणाऱ्या ११ मुले किंवा मुली यांच्या नावाने दोन हजार रुपये डिपॉझिट करण्यात येणार असल्याचे पाटील यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस उत्सव अध्यक्ष सचिन शिवशक्ती, वैभव विभूते, आनंद मुस्तारे, शिवानंद सावळगी, संतोष केंगनाळकर, मल्लिनाथ सोलापुरे, रेवन आवजे आदी उपस्थित होते.

## नगरपरिषदेने गायब दिवे अखेर पोलवर लावले

**सुराज्य/मोहोळ**

**पंढरपूर रोडवर चंद्रमौळी गणेश मंदिर पर्यंत रस्ता रुंदीकरण दरम्यान लगतचे लाईटचे पोल स्थलांतरित करण्यात आले होते. मात्र दिवे गायब होते सामाजिक कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळे अखेर नगरपरिषद प्रशासनाने दखल घेत एस टी स्टॅंड ते चंद्रमौळी गणेश मंदीर परिसरात दिवे लावले.**




मोहोळ-पंढरपूर-आळंदी अशा पालखी मार्गाचे काम सुरू असून या कामासाठी विद्युत पुरवठा करणारे पोल स्थलांतरित करण्यात आले होते. एकूण १६ पोल स्थलांतरित करण्यात आले मात्र त्या पोल वरती असलेले पथदिवे गायब झाले आहेत. यासंदर्भात मोहोळ नगरपरिषदेने पालखी मार्गाचे प्रकल्प संचालकांना दोन वेळा पत्रव्यवहार करूनही नगरपरिषदेच्या पत्राला केराची टोपली दाखवली जात होती. स्थलांतरित करण्यात आलेल्या पोलवरती पथदिव्यांसाठी तारा ओढलेल्या नसल्यामुळे हे काम रखडले होते. चंद्रमौळी गणेश मंदिर परिसरात सायंकाळी मोहोळ शहरातील वयोवृद्ध नागरिक फेरफटका मारायला येतात. त्या परिसरामध्ये पथदिवे नसल्याने वाहनचालकांना ही तारेवरची कसरत करावी लागत होती. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते भारत नाईक यांनी सातत्याने पाठपुरावा करत भविष्यात या ठिकाणी मोठी दुर्घटना घडल्यास कोण जबाबदार असा प्रश्न उपस्थित केला होता. याबाबत नगरपरिषद प्रशासनाने दखल घेऊन स्थलांतरित केलेल्या पोलवरती पूर्वीप्रमाणे पथदिवे बसविले. त्यामुळे चंद्रमौळी गणेश मंदिर या परिसरात पहाटे व सायंकाळी फिरायला जाणाऱ्या नागरिकांची तसेच वाड्यावर वस्त्यांवर जाणाऱ्या शेतकऱ्यांची सोय होणार आहे. नगर परिषदेचे विद्युत विभागाचे कर्मचारी बालाजी काटकर, महेश भोसले व नरहरी पवार या कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

### पथदिव्यांचे काम सुरू : सपाटे

सद्यस्थितीत मोहोळ बस स्थानक पासून ते चंद्रमौळी गणेश मंदिरापर्यंत पथदिवे बसविण्याचे काम सुरू आहे. यामुळे त्या ठिकाणाहून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांची वाहन चालकांची सोय होणार आहे, असे नगर परिषदेचे विद्युत अभियंता राजकुमार सपाटे यांनी सांगितले.

## अज्ञात चोरट्याने मोबाईल पळवला

**सोलापूर** : नवी पेठेतील एका मिठाई दुकानाच्या तिसऱ्या मजल्यावरचे बांधकाम चालू असलेल्या उघड्या खिडकीतून दुकानाच्या आत प्रवेश करत अज्ञात चोरट्याने दुकानाच्या काउंटर ड्रायव्हरमधील मोबाईल चोरून नेला आहे. चोरट्याने तोंडाला मास्क लावून मोबाईल चोरून नेल्याचे सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसत आहे. ही घटना दि.१० एप्रिल रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास नट्स मिठाई नवी पेठ येथे घडली.याप्रकरणी संदीप लक्ष्मण घाटे (वय-३०, रा.टिळक चौक) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार कदम हे करीत आहेत.

## मिठ्ठुमल माखिजा यांचे निधन



सोलापूर :- अंत्रोळीकर नगर नं. १ मधील रहिवासी मिठ्ठुमल बनुमल माखिजा (वय ५०) यांचे आस्कमित निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी व नातवंडे असा परिवार आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

■ माढा बाजार समिती निवडणूक

# प्रा.सावंत यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय आघाडीच्या प्रचाराचा शुभारंभ



✔ सुराज्य/माढा

**माढा तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती कुर्डूवाडीच्या पंचवार्षिक निवडणुकीचे रणशिंग फुंकले असून शिवसेनेच सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख प्रा शिवाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय पॅनलच्या प्रचाराचा शनिवारी रांजणी येथील ओंकारेश्वर मंदीरात शुभारंभ करण्यात आला. यामुळे विविध स्तरावर आघाडीबाबत चर्चा सुरू असतानाच प्रा सावंत यांच्या नेतृत्वाखाली प्रचार सुरू झाल्याने बिनविरोधची परंपरा खंडीत होणार यावर शिक्कामोर्तब झाले.**

बाजार समिती च्या निवडणूकीत १८ जागासाठी १४६ अर्ज दाखल झाले होते.यापैकी छाननींनंतर अवैध ठरलेल्या १३२ अर्जापैकी किती जण रिंगणात राहतात हे अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी स्पष्ट होणार आहे. बाजार समितीच्या स्थापनेपासून काँग्रेसच्या साठे आणि राष्ट्रवादी च्या शिंदे परिवाराकडे सत्ता राहिलेली आहे.गेल्या अनेक वर्षापासून आमदार बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आ. संजयमामा शिंदे यांचेकडे कारभाराची सूत्रे आहेत. गतनिवडणूकीत माजी आमदार ॲड. धनाजीराव साठे यांनी भरलेले सर्व अर्ज काढून घेत निवडणूक बिनविरोध केली होती.

चालू वर्षी महाविकास आघाडीच्या घटक पक्षात आघाडी होण्याची शक्यता असून सत्ताधारी राष्ट्रवादी, काँग्रेस, शेकाप, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे काही कार्यकर्ते आदींना कशी संधी देतात यावरती आघाडीचे भवितव्य अवलंबून आहे.

दरम्यान प्रा शिवाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय मोट बांधून सत्ताधाऱ्यांना आवाहान देण्यासाठी व्यूहरचना आखली आहे. शिवसेनेचे माढा लोकसभा प्रमुख संजय कोकाटे यांच्यासह भाजप शिवसेना, रयत क्रांती संघटना जनशक्ती शेतकरी संघटना, राष्ट्रीय समाज पक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना, मनसे, संभाजी ब्रिगेड प्रहार संघटना आदी विविध पक्ष आणि संघटनाना सहभागी करून घेतले आहे.

यामुळे चालू वर्षीची निवडणूक रंगतदार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रांझणी येथे झालेल्या प्रचाराच्या शुभारंभाप्रसंगी प्रा. शिवाजीराव सावंत, संजय कोकाटे, योगेश बोबडे, माऊली सलगर, प्रा. सुहास पाटील, अतुल खुपसे, शिवाजी पाटील, प्रशांत गिड्डे, सचिन जगताप, अमोल जगदाळे, आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# महापालिकेच्या आरोग्य विभागात ५१ पदांची भरती

▶ **जि.प.आरोग्य विभागाकडून मिळणार ६ डॉक्टर**

✔ **सोलापूर** : नागरी आरोग्य केंद्रे, आरोग्यवर्धिनी केंद्रांसह महापालिकेच्या डफरीन हॉस्पिटलमध्ये आता लॅब टेक्निशियन, फार्मासिस्ट, मायक्रो बायोलॉजिस्ट, परिचारिका, डॉक्टर्स, अशी एकूण ५१ पदभरती केली जाणार आहे.

महापालिका परिसरात १२ आरोग्यवर्धिनी केंद्रांना मंजुरी मिळाली असून त्याठिकाणी (नागरी आरोग्य उपकेंद्रे) जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून प्रत्येकी एक बीएएमएस डॉक्टर मिळणार आहेत. आतापर्यंत ६ डॉक्टर्स मिळाले असून आणखी तेवढेच डॉक्टर मिळणार आहेत. सद्य:स्थितीत महापालिकेकडे ८ कंत्राटी डॉक्टर्स आहेत.



त्यामुळे झेडपीकडून मिळणारे ६ डॉक्टर्स आता डफरीनमध्ये नेमले जाणार आहेत. दरम्यान, राष्ट्रीय आरोग्य अभियानातून नागरी आरोग्य केंद्रांमधील डॉक्टरांचे मानधन शासनाकडून मिळणार आहे. त्यातच पुन्हा नागरी आरोग्य केंद्रांमध्ये एमबीबीएस पूर्ण केलेल्यांनाच नेमणूक दिली जाते. त्यामुळे महापालिकेने कोरोना कालावधीत नेमलेले कंत्राटी बीएएमएस डॉक्टर्स कमी केले आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियानातून (एनएचएम) महापालिकेला शहरातील १५ नागरी आरोग्य केंद्रांमध्ये एमबीबीएस डॉक्टर्स मिळणार आहेत. आतापर्यंत ११ डॉक्टर्स भरले आहेत. आणखी चार पदे भरली जाणार आहेत. सध्या महापालिकेच्या १२ नागरी आरोग्य केंद्रांमध्ये कंत्राटी वैद्यकिय अधिकारी आहेत. एनएचएमअंतर्गत नागरी आरोग्य केंद्रांमधील वैद्यकिय अधिकारी एमबीबीएस' असावेत, अशी अट आहे. त्यामुळे सध्या त्याठिकाणी कार्यरत १२ बीएएमएस वैद्यकिय अधिकाऱ्यांना कामावरून कमी करण्यात आले आहे. दरम्यान, पुढील आठवड्यापासून या प्रक्रियेला सुरूवात होईल, असे महापालिकेचे आरोग्य अधिकारी बसवराज लोहारे यांनी सांगितले.







# लोकशाही वाचवण्यासाठी शिवराय शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांची गरज : डॉ. जाधव

सुराज्य/सोलापूर

**देशातील लोकशाही वाचवण्यासाठी शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारांची समाजाला नितांत गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षि शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजच्या तरुणाईला सांगितले तरच भारतीय लोकशाही टिकेल, असे मत व्याख्याते डॉ. बालाजी जाधव यांनी मांडले.**



क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कुर्डूवाडीत विश्वरत्न जयंती उत्सव मंडळ, पटेल चौक मित्रमंडळ व आझाद समाज पार्टी यांच्यावतीने आयोजित प्रबोधनाचा महाजागर या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आ. संजयमामा शिंदे होते.

प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमेला आ. संजयमामा शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन प्रबोधनपर गीतांचा बहारदार कार्यक्रम राजेंद्र लंकेश्वर, बापू कांबळे, विलास लंकेश्वर यांनी सादर केला.

यावेळी अमरकुमार माने, आबासाहेब खारे, दिलीप गडदे, चेतन शहा, दयानंद जाधव, दिनेश जगदाळे, जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, हर्षल बागल, योगेश जाधव, जगन्नाथ क्षीरसागर, ॲड. हरिश्चंद्र कांबळे, किसन हनवते, हरिदास बागल, विशाल गोरे, प्रा. आशिष रजपूत, निलेश देशमुख, अर्जुन गाडे, हर्षद मुलाणी, धनंजय कोकरे, अभिजीत सोलंकर, दत्ताजी काकडे, समाधान दास, फिरोज खान, हमिद शिकलकर, युवराज कोळी, नीता खटके, लता मोरे, भाग्यश्री पाटील, सुलताना शिकलकर, रूपाली महिंगडे, अमृता मोरे उपस्थित होते.

# ब्रह्मपुरीत अवैध वाळू साठ्यांवर मंगळवेढा पोलिसांची कारवाई

## उपशासाठी वापरण्यात येणारी वाहने जप्त

सुराज्य/मंगळवेढा

**ब्रह्मपुरी (ता. मंगळवेढा) येथे बठाण रोडवरील भीमा नदीकाठी शेतातून रस्ता करून यारीच्या सहाय्यानं काढण्यात आलेल्या अवैध वाळू उपश्यावर पोलिसांनी कारवाई करत लाखो रुपये किमतीचा मुद्देमाल शनिवारी सकाळी जप्त केला. ही कारवाई पो.नि. रणजितसिंह माने व स.पो.नि. बापूसाहेब पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू तस्करांच्या विरोधात पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर आल्याने अवैध वाळू वाहतुकीला चाप बसणार आहे.**



मंगळवेढा पोलीस ठाण्यातील बोराळे बिटचे तुकाराम कोळी, महेश कोळी, ईश्वर दुधाळ व इतर पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील आदी पथक पेट्रोलिंग करत असताना बठाण रोडवर शेतात वाळू काढण्यात आल्याचे दिसून आले. कोणतीही परवानगी नसताना वाळू साठा मिळून आला असे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे. मंडळ अधिकारी इंगोले, तलाठी शेख यांनी अवैध वाळू साठ्याचा पंचनामा केला.

शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून चोरट्या मार्गाने वाळू वाहतूक वाळू साठ्याचा गोरखधंदा ब्रह्मपुरी परिसरात सध्या फोफावत होता. बठाण रोडवरून अवैधरीत्या वाळूची मोठ्या प्रमाणावर राजरोस चोरटी वाहतूक करण्यात येत असल्याच्या नागरिकांच्या वाढत्या तक्रारी होत्या.

यापूर्वी ठोस कारवाई न झाल्याने वाळू माफियांचे फावत होते. परिणामी शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडवून नुकसान होत होते. विनाक्रमांक धावणाऱ्या वाहनांमधून ही चोरटी वाळू वाहतूक सुरू होती. या कारवाईने वाळू चोरांचे धाबे दणाणले आहे. या प्रकरणी मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जावयाला सासऱ्यासह मेव्हण्याने केली मारहाण

सुराज्य/सोलापूर : मुलगा झाल्याने त्याला पाहण्यासाठी गेलेल्या जावयाला सासऱ्याने व मेहुण्याने मिळून मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत सिध्दार्थ चंद्रकांत होनकळस (वय-२६, रा. शिवसृष्टी नगर, शेळगी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सिध्दार्थ हे आपल्या आईसोबत पत्नीच्या माहेरी मुलाला पाहण्यासाठी बाळे येथील मडकी वस्ती येथे गेले. तेथे जाऊन चर्चा करताना सिध्दार्थ पत्नीने त्यांच्यासोबत सासरी येण्यास नकार दिला. त्यावेळी झालेल्या वादातून सिध्दार्थ यांना सासरा दिगंबर नरसिंगराव घुमटे, मेहुणा अक्षय घुमटे, सासू जया घुमटे, अवधूत चव्हाण यांनी मिळून फिर्यादीला व त्यांच्या आईला मारहाण करत जखमी केले, अशा आशयाची फिर्याद होनकळस यांनी दिली आहे. वरील चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक घुगे हे करीत आहेत.

## घरगुती गॅसचा अवैधरित्या वापर; तिघांवर गुन्हा दाखल

लिमयेवाडी येथील १६ शौचालयाजवळील एका पडीक घरामध्ये घरगुती वापरायचा गॅसच्या एकूण पाच टाक्या अवैधरित्या जवळ बाळगून विद्युत मोटारीच्या साह्याने रिक्षामध्ये भरत असताना तिघांना ताब्यात घेतले. ही घटना दि.१३ एप्रिल रोजी घडली. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक श्रीनाथ लक्ष्मण महाडिक यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून साहिल मनोज जाधव (वय-२३, रा. लिमयेवाडी), रिक्षाचालक असलीम महेबुब तांबोळी व अंबादास मारुती गायकवाड (रा. लिमयेवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. त्यांच्याकडून एकूण १ लाख १९ हजार ६०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. तपास पोलीस नाईक वाबळे हे करीत आहेत.




## पैसे न दिल्याने मारहाण

दारू पिण्यास पैसे का दिले नाहीत म्हणून पत्नीला शिवीगाळ करत घरासमोर पडलेल्या लाकडाने पतीने पायास, पाठीवर मारहाण करून तसेच तोंडावर लाकूड मारून दुखापत केली आहे. अशा आशयाची फिर्याद दीपिका रमेश म्हेत्रे (वय-३२, रा. लहान ईराण्णा वस्ती) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती रमेश नारायण म्हेत्रे (वय-३७, रा. लहान ईराण्णा वस्ती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १३ एप्रिल रोजी रात्री नऊ वाजण्याच्या दरम्यान फिर्यादी यांच्या घरासमोर घडली. घटनेचा पुढील तपास मपोना चव्हाण या करीत आहेत.

## मोटारसायकल स्लिप झाल्याने एकाचा मृत्यू

हत्तूर गावाच्या ब्रीज जवळील हायवेवर एका इसमाची मोटारसायकल स्लीप होऊन त्याचा मृत्यू झाला. हा अपघात ४ डिसेंबर २०२२ रोजी झाला. हुसेन सैफन शेख (वय-४६, रा. मु.पो. मंद्रुप) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. हुसेन शेख हे मोटारसायकल क्र. एमएच.१३.डीआर.२८७८ यावरून काम संपवून सोलापूरवरून मंद्रुपला जात असताना, हुसेन यांनी त्यांची मोटारसायकल वेगाने चालवून स्लिप होऊन पडल्याने डोक्यास गंभीर दुखापत झाली. दरम्यान हुसेन यांचा १६ फेब्रुवारी २०२३ रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला. पोहेकॉं विलास घुगे यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे. तपास पोसई वाल्मिकी हे करीत आहेत.

## तलावात अनोळखी इसमाचा मृतदेह

छ. संभाजी महाराज तलावात शनिवारी सकाळी एक अनोळखी इसम पाण्यात तरंगताना आढळला. ही माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी त्या इसमाला बाहेर काढून छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल केले. दरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. शनिवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास एक अनोळखी इसम पाण्यात तरंगत असताना नागरिकांना आढळले. याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली. पोलिसांना याची माहिती मिळताच सदर बाझार पोलीस ठाण्याचे हवालदार राऊत हे घटनास्थळी दाखल झाले. तो इसम अंदाजे ४० ते ४५ वर्षाचा अंदाज पोलिसांकडून वर्तवण्यात आला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## तरुणाकडून महिलेस मारहाण

आजीला शिवीगाळ करत मारहाण करताना सोडवण्यासाठी गेलेल्या सोनी गणेश डफळे (वय-२४, रा. जुना विडी घरकुल) यांना हाताने शिवीगाळ करत बघून घेण्याची धमकी दिल्याप्रकरणी तरूणावर गुन्हा दाखल झाला आहे. गणेश डफळे (रा. समाधान नगर) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास हवालदार चव्हाण करत आहेत.

## निष्काळजीपणाने वाहन चालवल्याप्रकरणी गुन्हा दाखल

पार्क चौकात अभिवादन करण्यासाठी जमलेल्या लोकांमध्ये मोटारसायकल घेऊन येऊन निष्काळजीपणाने वाहन चालवत, तेथे आपली दुचाकी गोल गोल फिरवून लोक जखमी होतील अशा उद्देशाने दुचाकी चालवली. या प्रकरणी एका दुचाकी चालकावर सदर बाझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत रामा भिंगारे यांनी फिर्याद दिली आहे. या घटनेचा तपास चव्हाण हे करीत आहेत. ही घटना शुक्रवारी मध्यरात्री घडली.

# बायोमायनिंग प्रकल्पाला १० कोटी मंजूर

## निधी पुन्हा मिळविण्यात महापालिकेला यश

सुराज्य/सोलापूर

**भोगाव कचरा डेपो परिसरातील नागरिकांची समस्या लक्षात घेऊन सुरू करण्यात आलेल्या बायोमायनिंग प्रकल्पाला पूरक, अशी सॅनिटरी लॅण्डफिलींग प्रकल्पासाठी शासनाने १० कोटी रुपये मंजूर केले आहे. शासनाकडून मिळालेल्या भरगच्च निधीतून भोगाव कचरा डेपोतील समस्या दूर होण्यास मदत होणार आहे.**

भोगाव कचरा डेपो परिसरात कचरा विलगीकरण, विघटनीकरण अशा विविध कामांचा समावेश असलेला बायोमायनिंग प्रकल्प परिपूर्ण होणे होण्यासाठी तत्कालीन आयुक्त पी. शिवशंकर यांनी ३८ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. दरम्यान मेट्रिक टन व क्यूबिक मीटरमधील आकडेवारीचा घोळ, सॅनिटरी लॅंडसाठी निश्चित केलेली पूर्वीची चुकीची जागा, त्यासाठी नव्याने आखावे लागणारे बफर



झोन या सर्व तांत्रिक त्रुटींमुळे या प्रकल्पाला १४ कोटी रुपयांची कात्री लागली. या प्रस्तावातील तांत्रिक चुकांमुळे या प्रकल्पाला शासनाकडून केवळ २४ कोटी रुपयांची निधी मिळाला. मिळालेल्या निधीतून बायोमायनिंग प्रकल्प उभारणीला सुरुवात झाली तर उर्वरित परंतु अत्यंत महत्वाचा असलेला सॅनिटरी लॅण्डफिलींग प्रकल्पासाठी १० कोटी रुपये महापालिकेने शासनाकडे मागणी केली होती, त्यासाठी महापालिकेने शासनाकडे दहा कोटींचा नव्याने विकास आराखडा सादर केला होता. हा प्रकल्प परिपूर्ण होण्याकरिता कात्री लागलेला निधी पुन्हा मिळविण्यासाठी महापालिकेची धडपड सुरू होती, आता सॅनिटरी लॅंड फिलिंगकरिता शासनाकडून दहा कोटी रुपये प्राप्त झाले आहेत.

घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शासनाने महापालिकेची झोळीत भरभरून टाकले असले तरी याचा विनियोग योग्य पध्दतीने होणे गरजेचे आहे. प्राप्त निधीचा मुख्य उद्देश साध्य करून यंदा सोलापूरचे रॅंक वाढविणार की घसरविणार हे एप्रिल महिन्यातील सर्व्हे क्षणानंतरच स्पष्ट होणार आहे.

# मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत काव्या देशमुख राज्यात दुसरी

सुराज्य/कुर्डूवाडी

राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत तांबवे टें (ता. माढा) येथील तिसरीत शिकणाऱ्या काव्या निलेश देशमुख हिने ३०० पैकी २९६ गुण मिळवून राज्यात दुसरा क्रमांक मिळविला.



'मंथन पब्लिकेशन' आयोजित मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा ही इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी संपूर्णपणे स्पर्धा परीक्षेच्या धर्तीवर घेण्यात येते. काव्या ही आदर्श पब्लिक स्कूल, कुर्डूवाडीची विद्यार्थिनी असून तीला वर्गशिक्षिका सुरेखा कांबळे, आई सोनाली देशमुख, वडील निलेश देशमुख, तानाजी खरात यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल तिचे विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे संचालक सुरेश बागल, आएएस अधिकारी रमेश घोलप, गटशिक्षणाधिकारी बंडू शिंदे, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी आनंद जाधव, केंद्रप्रमुख सिमिंता कुंभार, अमोल सुरवसे, संचालिका पुजा सुरवसे, गोरख खटके-पाटील, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष तात्यासाहेब पाटील आदींनी अभिनंदन केले.

## चोरट्याने दुचाकी पळवली

सुराज्य/सोलापूर : सोरेगावजवळील राजेसाब दर्गाजवळ पार्क करून ठेवलेली दुचाकी (क्र. एमएच.१३.बीसी.५२२५) चोरट्याने चोरून नेली आहे. याप्रकरणी शिवराज माधवराव सरतापे (वय-४९, रा. स्वामी विवेकानंद नगर भाग १, ओम गर्जना चौक, सैफुल) यांनी विजापूर रोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# गृहविज्ञान महाविद्यालयात आंबेडकर जयंतीनिमित्त विविध उपक्रम

सुराज्य/अकलूज

येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित व एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई संलग्नित रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२व्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित विविध ग्रंथांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. सदर ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे



ग्रंथपाल डॉ. ऋषी गजभिये यांनी केले. त्याचबरोबर सहा तास वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण ५५ विद्यार्थीनिंनी सहभाग नोंदविला. प्रास्ताविकेत सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. छाया भिसे यांनी केले. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. छाया भिसे, ग्रंथपाल डॉ. ऋषी गजभिये, डॉ. राजश्री निंभोरकर, कार्यालय प्रमुख विजय कोळी, अविनाश पताळे, सुनीता काटे, दीपक शिंदे, रमजान शेख यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम संपन्न झाले.

## अंबड येथे भरदिवसा घरफोडी

सुराज्य/कुर्डूवाडी

**अंबड (ता. माढा) येथील कदम वस्तीवर भरदिवसा बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने रोख रकमेसह सोन्याचांदीचे दागिने मिळून एकूण ६६ हजार रुपयांचा ऐवज घेऊन चोरून नेला.ही घटना कदमवस्ती अंबाड ता. माढा येथे दि. १३ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वा. च्या सुमारास घडली. याबाबत अक्षय नारायण कदम यांनी कुर्डूवाडी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.**

अक्षय कदम त्यांच्या आईसह शेतात कामासाठी गेले होते. त्यांचा भाऊ जेसीबीवर कामाला गेला होता. तर वडील अंबड येथे टेलरिंग दुकानात गेले होते. दुपारी ३ वाजता अक्षय व त्यांची आई परत घरी आले असता त्यांना दोन्ही दरवाज्याचे कुलुप तोडलेले दिसले. त्यांना कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले.

चोरट्याने कपाटात ठेवलेली रोख रक्कम ३० हजार व ३५ हजारांची सोन्याचे दागिने व १ हजारांची लहान मुलाचे पैंजण व साखळी असा एकूण ६६ हजारांचा ऐवज लंपास केल्याचे दिसून आले. कुर्डूवाडी पोलिसांत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

अशाच पद्धतीने बारलोणीत येथेही दुपारी चोरीची घटना घडली आहे. यामुळे दोन्ही चोरीची पद्धत एकच दिसत आहे.

# आंतरराष्ट्रीय कौशल्य महोत्सवासाठी उमेदवारांना नावनोंदणीचे आवाहन

सुराज्य/सोलापूर : आंतरराष्ट्रीय कौशल महोत्सव मेगा इंटरनॅशनल रिक्रूटमेंट ड्राईव्हमध्ये आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधी उपलब्ध असून, इच्छुकांनी https://kaushalmahotsav.nsdcdigital.org/International/Candidate/Candidate-Registration या लिंक द्वारे नोंदणी करावी, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता सचिन जाधव यांनी केले आहे.

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, लॅमरिन टेक स्किल युनिव्हर्सिटीच्या सहकार्याने देशातील युवक युवतींना विविध क्षेत्रांमध्ये आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याकरिता आंतरराष्ट्रीय कौशल्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात मेगा इंटरनॅशनल रिक्रुटमेंट ड्राईव्हमध्ये यूएसए, कॅनडा, यूके, युरोप, जिसीसी, पश्चिम आणि दक्षिण आशिया, जपान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि पूर्व आणि दक्षिण आशियातील आंतरराष्ट्रीय नियोक्ते सहभागी आहेत. लॉजिस्टिक, उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, परिधान, पर्यटन, आरोग्यसेवा आदी क्षेत्रातील रोजगार संधीचा समावेश आहे. इच्छुक उमेदवारांनी १६ एप्रिल २०२३ पर्यंत वरील लिंक द्वारे नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी ०२१७ -२९५०९५६येथे संपर्क साधावा.

## २८ मे रोजी धनगर वधू-वर समाजाचा पालक परिचय मेळावा

सुराज्य/सोलापूर : पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरात रविवार दि. २८ मे २०२३ रोजी धनगर वधू-वर समाजाचा पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती मेळाव्याचे सदाशिव होनमाने यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. हा मेळावा शहरातील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन व माहिती पुस्तिका प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार. आहे. हा कार्यक्रम सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत राहणार आहे. तरी धनगर समाजातील जास्तीत जास्त वधू-वरांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस कार्याध्यक्ष सदाशिव होनमाने, उपाध्यक्ष भीमाशंकर काळे, सुहास गडदे, सुनील सलगर, विमल सापडणेकर, बाळकृष्ण बंडगर, देवेंद्र मदने आदी उपस्थित होते.

# शहरात विविध ठिकाणी डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

सुराज्य/सोलापूर

**शहरात विविध ठिकाणी जयंतीनिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्था, संघटनतर्फे विविध उपक्रम राबवण्यात आले.**

**महापालिकेत पुतळ्याचे अनावरण**

महानगरपालिकेतील सर्वंट सोशल फाउंडेशन यांच्यावतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. महापालिका आयुक्त शितल तेली-उगले, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी नगर अभियंता प्रमुख लक्ष्मण चलवादी, मुख्य लेखापरीक्षक रुपाली कोळी, महिला व बालकल्याण अधिकारी विठ्ठल कस्तुरे, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, अविनाश वाघमारे, विजय लोखंडे, आनंद चंदनशिवे, गणेश पुजारी, कामगार नेते अशोक जानराव, प्रदीप जोशी आदी उपस्थित होते. यावेळी समता सैनिक दलाच्यावतीने मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी उपस्थितांना लाडू वाटप करण्यात आले.

**आनंद फाउंडेशनचा प्रशंसनीय उपक्रम**



आनंद फाउंडेशने सामाजिक बांधिलकी जोपासत इतर होणारा अनावश्यक खर्च टाळून आदिवासी वंचित विद्यार्थी आश्रम, मुळेगाव येथील निवासी आश्रम शाळेमधील ४२ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, क्रिडा साहित्य, ग्रीन बोर्ड, चप्पल व शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप केले. यावेळी संचालक परमेश्वर काळे, आनंद फाउंडेशनचे संस्थापक आनंद मंदोल्लू, अध्यक्ष गणेश मंदापुरे, श्रीनिवास मंदोल्लू, आकाश साबळे, बाबा केशपागुल, व्यंकटेश कोपलल्लू, शिवा कावल, अजय मंदोल्लू, चिंना दोंतुल आदी उपस्थित होते.

**भीमशक्ती सेना तरुण मंडळ**

मिलिंद नगर येथील भीमशक्ती सेना तरुण मंडळाच्यावतीने सालाबादप्रमाणे यंदाही आतिषबाजीचा कार्यक्रम पार पडला. हे शोभेचे दारूकाम पाहण्यासाठी महिलांसह आबालवृद्धांनी मोठी गर्दी केली होती. गेल्या ३३ वर्षांपासून हा आतिषबाजीचा सोहळा आयोजित करण्यात येतो. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विशाल माने, आतिश बनसोडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**बोधीसत्व मध्यवर्ती महामंडळ**

क्रांतिसूर्य म. ज्योतिबा फुले यांच्या १९६व्या जयंतीनिमित्त बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती महामंडळातर्फे सुपर मार्केट येथील त्यांच्या पुतळ्यास विश्वस्त समितीचे अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे व आनंद चंदनशिवे, उत्सव समितीचे अध्यक्ष सुहास सावंत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. महामंडळाचे उत्सव अध्यक्ष सुहास सावंत, केरु जाधव, मिलींद प्रक्षाळे, अजित बनसोडे, पप्पू गायकवाड, अय्याज दिना, मतीन बागवान, दीपक गवळी, लखन भंडारे, दत्ता शिंदे, अविनाश भडकुंबे, अनिल जगझाप, विजयानंद उघडे आदी उपस्थित होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ**

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या हयातीतील प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी डॉ. शैलेश सुरते, सतीश सरवदे, किरण जाधव, मैंदर्गीकर, बडेकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# चंद्र-सूर्य असेपर्यंत बुध्देहाळ तलावाचा तळ दिसणार नाही : आ. पाटील

✔ सुराज्य/सांगोला

**सांगोला तालुक्यातील बुध्देहाळ तलावाच्या पाण्यासाठी या परिसरातील जनता गेली ५० वर्षे संघर्ष करीत होती. या संघर्षाला आता पूर्णविराम मिळतोय कारण टेंभू उपसा सिंचन योजनेत बुध्देहाळ तलावाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे चंद्र-सूर्य असेपर्यंत बुध्देहाळ तलावाचा तळ दिसणार नाही याची मी हमी देतो, असे प्रतिपादन सांगोला तालुक्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी केले. चोपडी येथे 'खासदार-आमदार आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत ते बोलत होते.**

यावेळी माढा लोकसभा मतदारसंघाचे खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर, सांगोला तालुका भाजप अध्यक्ष चेतनसिंह केदार, युवा नेते सागर पाटील, दादासाहेब लवटे, उपसरपंच पोपट यादव, सरपंच मंगल सरगर, दगडू बाबर, ग्रामपंचायत सदस्य दिनकर बाबर, अनिल जगदाळे, गुंडादादा खटकाळे, पोलीस निरीक्षक कुलकर्णी, विविध खात्यांचे पदाधिकारी यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.



आमदार शहाजीबापू पाटील पुढे म्हणाले की, 'या परिसरात असणाऱ्या विविध रस्त्यांच्या कामांचा प्रश्न मार्गी लागला आहे.' नाझरे ते चोपडी या रस्त्याचे कॉन्ट्रॅक्टर यांना आम्ही सातत्याने समज देत आहे, आता अजून एकदा समज देऊन त्यांनी ते काम पूर्णत्वास नाही आणले तर आम्ही वेगळा निर्णय घेऊन ते काम पूर्णत्वास आणू असा शब्द दिला.

यावेळी यशवंत बाबर, आर. एस. बाबर यांनी परिसरातील विविध मागण्यांबाबत आपले विचार व्यक्त केले. मावळतिच्या सूर्याची शपथ घेऊन या भागाला पाणी आणतो म्हणणारे या भागातील माजी खासदार यांनी या भागाला आतापर्यंत कोरडेच ठेवले होते. याउलट या भागाला येणारे पाणी त्यांनी सातत्याने बारामतीला पळवले आहे. पाणी परिषदा आटपाडीला व्हायच्या, सांगोल्याला व्हायच्या, पाणी मात्र दुसरीकडे जायचे. गाईला चारा आपण चारायचा, दूध मात्र बारामतीला न्यायचं, अशा या सगळ्या गोष्टींमुळे इथल्या सामान्य जनतेला त्रास सहन करावा लागत होता. यासाठी प्रचंड मोठा संघर्ष करावा लागला. म्हणूनच सांगोला तालुका आज विविध योजनांमुळे प्रगतीपथावर आहे. येणाऱ्या काळात आपल्या सर्वांच्या विविध अडीअडचणी आम्ही सोडवण्यास कटिबद्ध आहोत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



## बोंडले ग्रामपंचायतच्यावतीने महिलांना चादर वाटप

✔ **सुराज्य/वेळापूर** : बोंडले (ता. माळशिरस) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून बोंडले ग्रामपंचायतीच्यावतीने १५ टक्के मागासवर्गीय निधीतून वेळापूर पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक काझी, बोंडले ग्रामपंचायतचे सरपंच व स. म. शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक विजयसिंह देशमुख, बोंडले विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन मधुकर जाधव यांच्या हस्ते महिलांना चादरीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला बोंडले सरपंच विजयसिंह देशमुख, उपसरपंच वैशाली आप्पासो शिंदे, सोसायटी चेअरमन मधुकर जाधव, ग्रामपंचायत सदस्य महेंद्र लोंढे, सोनाली आनंद जाधव, साधना प्रदीप पाटील, दिपाली राजू बिले, पार्वती विष्णू नाईकनवरे, नितीन शिंदे, आनंद जाधव, विशाल गायकवाड, लालासो जाधव, तानाजी जाधव, डॉ. जयंत चव्हाण, पत्रकार विजयकुमार देशमुख, दिनेश माने-देशमुख, महादेव जाधव,सुनील पाटील, पंडित माने देशमुख, ॲड. रणजीत माने देशमुख, ॲड. महेश लोंढे, स्वप्नील सोनवणे, नितीन लोंढे, दादा मोरे, गोविंद लोंढे, कांता नाईकनवरे, सिध्दार्थ लोंढे, योगेश तुपे, विजय लोंढे व ग्रामस्थ उपस्थित होते.



## जिजाऊ ब्रिगेडतर्फे डॉ. आंबेडकर जयंती

✔ **सुराज्य/अकलूज** : जिजाऊ ब्रिगेड जिल्हा कार्याध्यक्षा मीनाक्षी अमोल जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर पंढरपूर विभागाच्यावतीने अकलूज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी प्राध्यापक जगदाळे म्हणाल्या, 'सर्व जातिधर्माच्या लोकांनी एकत्रितपणे सर्वांना मानसन्मान देऊन एकजुटीने मानवतावादी धर्माने राष्ट्रनिर्मिती करता येईल. सर्वांना बरोबरीचे स्थान देऊन आपण राष्ट्रनिर्मिती करू शकतो. फुले, शाहू आंबेडकर यांच्या सर्वांची जी उत्कृष्ट विचारधारा आहे ती आपण सर्वांनी आचरणात आणावी. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक मीनाक्षी जगदाळे, शारदा चव्हाण, पायल मोरे, वनिता कोरटकर, रेश्मा गायकवाड, नेहा माने, उज्वला अडाणे, वैष्णवी गायकवाड, सुजाता क्षीरसागर, संध्या गायकवाड स्नेहल गायकवाड आदी उपस्थित होते.




## स्वेरीत विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन सत्र

✔ **सुराज्य/पंढरपूर** : स्वेरीमध्ये पदवी इंजिनिअरिंगमधील सर्व विभागांच्या विद्यार्थ्यांसाठी प्रख्यात वक्ते आणि प्रशिक्षक नानासाहेब साठे यांनी एनएलपी फॉर स्टुडंटस्, इनर वेलने, फ्रंट लोब ॲक्टीवेशन या विषयावर मार्गदर्शन केले. दि. २७ मार्च ते ०२ एप्रिल २०२३ या दरम्यान ही कार्यशाळा पार पडली.

स्वेरी अभियांत्रिकीचे विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम. एस. मठपती आणि प्रथम वर्ष विभागप्रमुख डॉ.एस. ए. लेंडवे यांनी आठवडाभर चाललेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन केले. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना त्यांचा आत्मविश्वास द्विगुणीत करण्यासाठी प्रशिक्षकांकडून प्रोत्साहनपर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक विभागातील समन्वयकांनी कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. यावेळी सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार डॉ. यशपाल खेडकर यांनी केले.

## धायटी येथे मध्यान्ह भोजन योजनेचा शुभारंभ

✔ **सुराज्य/सांगोला** : धायटी (ता. सांगोला) येथे बांधकाम कामगारांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध बांधकाम कामगार योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजन योजना धायटी येथे चालू करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत बांधकाम कामगारांना रोज मोफत जेवण मिळणार आहे. सर्व बांधकाम कामगार मजुरांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सरपंच वनिता कोळेकर यांनी केले आहे. यावेळी धायटी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही योजना चालू करण्यासाठी प्रकाश देवकते, कृष्णदेव भोसले, गोवर्धन तांबे सायबू बंडगर, शिवाजी तांबे, रवी मेटकरी, संजय कोळेकर, हनुमंत माडेकर, दगडू गायकवाड अंबादा जगदाळे, तानाजी पाटील, शहाजी देवकते, नवनाथ तांबे उत्तम लेंगरे, नवनात खरात-पाटील, गणेश कोळेकर, सुभाष कोळेकर, लक्ष्मण भोसले, कृष्ण साबळे, उमेश पाटील आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## फुले-आंबेडकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

✔ सुराज्य/वेळापूर

**महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

प्रारंभी उत्तमराव जानकर यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विद्यमान सरपंच रजनिश बनसोडे, बाळासाहेब धाईंजे, धनंजय साठे, मिलिंद सरतापे, विजय बनसोडे, भैय्यासाहेब बाबर, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, डॉ. बी. बी. ओहाळ, डॉ. अमर माने देशमुख, डॉ. अमोल कोळेकर, डॉ. उदयसिंह माने देशमुख, डॉ. जयंत चव्हाण, पिल्लूचे डॉ. दिलीप पवार, डॉ. धनंजय म्हेत्रे, डॉ. राजमाने, डॉ. महेश हजारे, सुनील झेंडे, कांतीलाल ठोकळे, दिलीप बनसोडे, रक्तदाते गोपाळ शिरसागर, रा. कॉंग्रेस जिल्हा महिला उपाध्यक्षा अश्विनी भानवसे, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत वायदंडे, नानासो मुंगुसकर, संजय देशपांडे, शिवप्रसाद देशपांडे, रविराज गायकवाड, मदनसिंह माने विनायक माने, दत्ता चंदनशिव, रणजित सरवदे, रायचंद खाडे यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी रक्तदान शिबिरात ९१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती समितीचे सर्व सदस्य, समाज बांधव, गणेश धांडोरे, सागर बनसोडे, शंकर लोंढे, हर्षद बनसोडे, आकाश सरवदे, आकाश तोरणे, राहुल सराटे, गणेश गालफाडे, नागेश सीतासावंत, आबा बनसोडे, अमित धाईंजे, पप्पू मुजावर, प्रशांत ऊर्फ अण्णा बनसोडे, अजित लोंढे आदी उपस्थित होते. आभार सरपंच रजनिश बनसोडे यांनी मानले.

## शिराळ येथील यात्रेत दोन गटात हाणामारी

### ▶ ॲट्रॉसिटीचा दाखल; १७ जणांविरोधात गुन्हा

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

**शिराळ अंबड (ता. माढा) येथील अंबाबाई गावदेवीच्या यात्रेमधील निघालेल्या छबिनामध्ये पायावर पाय पडला म्हणून जातिवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याने नऊजणांविरोधात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तर यात्रेसाठी जमा केलेले वर्गणीची दीड लाखांची पिशवी हिसकावून नेऊन मारहाण केली म्हणून आठ जणांविरोधात कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोहन टोपणे यांनी फिर्याद दाखल केली आहे. या प्रकरणात एकूण १७ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




शिराळ येथे दि.१२ रोजी आंबाबाई गावदेवीची यात्रा सुरू होती. यात्रेत देवीचा छबिना सायं. ७ वा. निघाला होता. यामध्ये ऑर्केस्ट्रा सुरू झाले. यावेळी गर्दीमध्ये एका मागास वर्गियाचा पाय सुरज टोणपे यांच्या पायावर पडला. त्यावेळी संबंधितांनी माफी मागितली. तरीही सुरज टोणपे यांनी नवनाथ टोणपे, वैजनाथ महादेव टोणपे, सौरभ टोणपे, प्रवीण टोणपे, नंदू सर, धनाजी टोणपे, गणेश टोणपे, दत्तात्रय टोणपे यांच्यासह त्यांना मारहाण करत जातिवाचक शिवीगाळ केली, अशी फिर्याद पोलीस ठाण्यात दिली आहे.

दुसऱ्या गुन्ह्यात छबिन्यातील ऑर्केस्ट्रा बंद करून यात्रेतील जमा झालेले दीड लाख रुपयांची वर्गणीची पिशवी हिसकावून घेऊन मारहाण केली म्हणून आठ जणांविरोधात कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गावदेवीच्या छबिन्यातील ऑर्केस्ट्रा कार्यक्रम बंद का केला या कारणावरून सुदर्शन टोणपे, बापू भिकाजी पांडगळे, साजन दयानंद नाईकनवरे, अजय टोणपे, अशोक टोणपे, वैभव महिंगडे, प्रज्ज्वल पांडगळे, सुमित बाळासाहेब सरवदे (सर्व रा. शिराळ) यांनी संगनमत करून काठीने मारहाण करत यात्रेसाठी जमा झालेली दीड लाखांची पिशवी हिसकावून घेऊन त्यांनी लाथाबुक्क्याने मारहाण करून शिवीगाळी व दमदाटी करून निघून गेले. म्हणून कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात ८ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शेळ्यांना पाण्यातून विषबाधा; गुन्हा दाखल

✔ सुराज्य/मोहोळ

**शेळ्यांना पाण्यातून विषबाधा केल्याप्रकरणी व त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला ही घटना एकरके परिसरात घडली.**

मोहोळ तालुक्यातील एकुरके पवारवाडी येथील अनिल गोविंद घोलप हे शेळी पालन करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात त्यांनी शेळीपालनासाठी घराशेजारीच गोठा उभारला आहे. त्यामध्ये एकूण १४ शेळ्या व बोकड आहे. घोलप हे शेळ्या चारण्यासाठी शेजारील शेतात घेऊन जातात व सायं. ०५:३० वा.च्या सुमारास परत वस्तीवर घेऊन जातात. ते १४ रोजी नेहमीप्रमाणे सर्व शेळ्या तानाजी पाटील यांच्या शेतात घेऊन गेले होते. त्यावेळी दु. १ वा.च्या सुमारास शेळ्यांनी शेतात दंडातून वाहत असलेले पाणी पिले. राहिलेल्या ६ शेळ्यांनी सिमेंटच्या हौदात असलेले पाणी पिले. त्याच दरम्यान ऊन जास्त झाल्याने घोलप हे सर्व चौदा शेळ्या घरी घेऊन गेले. घरी गेलेल्या सगळ्या शेळ्यांपैकी सिमेंटच्या हौदात पाणी पिलेल्या ६ शेळ्या तडफडत असलेल्या दिसल्या व त्यांच्या तोंडातून पांढरा फेस येत होता. त्यावेळी घोलप यांनी गावातील जनावरांच्या डॉक्टरांना फोन करून बोलावून घेतले. डॉक्टरने सर्व शेळ्यांना तपासून मयत झाल्याचे सांगितले.

## ग्रामदैवत वेताळसाहेब यात्रा उत्सव

## वाकावमध्ये रंगणार जंगी कुस्त्यांचा फड

### विजेत्यास चांदीची गदा देणार : ऋतुराज सावंत

✔ **सुराज्य/माढा** : वाकाव (ता. माढा) येथील ग्रामदैवत श्री वेताळसाहेब यात्रेनिमित्त गुरुवार दि. २० एप्रिलपासून निकाली कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले असून सर्वोत्कृष्ट कुस्तीगिराला चांदीची गदा, तर प्रथम व द्वितीय क्रमांकासाठी मोटारसायकल भेट देणार असल्याची माहिती वाकावचे युवा सरपंच ऋतुराज सावंत यांनी दिली.



राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रा. तानाजी सावंत व शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रेनिमित्त कुस्त्यांचा जंगी फड भरणार आहे. कुस्तीगिरांना रोख बक्षीसही देण्यात येणार आहेत. १९ ते २२ एप्रिल असे चार दिवस श्री वेताळसाहेब यात्रा भरणार आहे. १९ रोजी देव मिरवणे व ठिकाणावर बसवणे तसेच देवाचा छबिना रात्री ९ ते पहाटे ३ दरम्यान निघणार आहे. २० रोजी दुपारी २ ते रात्री ७ दरम्यान कुस्त्यांचा जंगी फंड भरणार असून रात्री ९ ते १२ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. २१ रोजी रात्री ९ ते १ दरम्यान लोकनाट्य तमाशा आहे. २२ रोजी अक्षय्य तृतीया दिवशी रात्री ८ वा. देवाची पालखी निघणार असून यात्रेचा हिशोब आणि रात्री ९ ते १२ दरम्यान डान्स स्पर्धा होणार आहेत.

वाकाव येथील या यात्रेचे सुंदर आणि भरगच्च नियोजन करण्याची तयारी असून सरपंच ऋतुराज सावंत यांनी सर्व बाबींवर लक्ष केंद्रीत करीत यात्राकाळात भाविकभक्तांना आणि नागरिकांना सर्व सोयीसुविधा पुरवण्याचे नियोजन केले आहे.

## श्रीपूरमध्ये आज आधारकार्ड अपडेट कॅम्प

✔ सुराज्य/श्रीपूर

येथील महाळुंग श्रीपूर नगरपंचायतीच्या नगरसेविका नाजिया मोहसीन पठाण, यांच्या सहकार्यातून श्रीपूर व परिसरातील नागरिकांसाठी दि. १६ रोजी सकाळी १० ते ६.०० पर्यंत मारुती मंदिर शेजारी योगेश जोशी यांच्या आधार सेंटर, पोस्ट ऑफिसच्यावर येथे मोफत आधार कार्ड डॉक्युमेंट अपडेट कॅम्प आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी ज्या नागरिकांना २०१५ पूर्वी आधार कार्ड काढलेले आहेत. त्यांनी आधार कार्ड डॉक्युमेंट अपडेट करून या योजनेचा लाभ घ्यावा. येताना आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान ओळखपत्र किंवा ड्रायविंग लायसन्स घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन शिवधैर्य बहुद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष मोहसीन पठान यांनी केले आहे.

## चंदनासह चार लाखांचे साहित्य जप्त

### ▶ चौघांवर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/मोहोळ

पेनूर-पाटकुल रोडवर चंदनाच्या लाकडाची विक्री करताना दोघांना मोहोळ पोलिसांनी पकडले. दोन दुचाकी, चंदन, विक्रीसाठी आणलेले तराजू असा एकूण ४ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पोलिसांनी ४ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

१४ एप्रिल रोजी पेनूर-पाटकुल जाणाऱ्या रोडवर अवैधरित्या चंदनाची विक्री करण्यासाठी काहीजण येणार आहेत, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांना मिळाली होती. त्यानुसार भारती यांनी सपोनि राजकुमार डुणगे यांच्यासह त्यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी पाठविले. त्यादरम्यान दुपारी तीनच्या सुमारास दोन अनोळखी इसम हे संशयास्पदरित्या दोन मोटार सायकलसह प्लास्टिकच्या पोत्यामध्ये लोखंडी वजनकाटा माप घेऊन बसलेले होते. त्यावेळी पोलिसांच्या पथकाने त्यांना पकडले व त्यांनी त्यांचे नाव आलामीन जमादार, गोरख प्रल्हाद सुरवसे (दोघे रा. पेनूर) असे सांगितले. त्यांच्याकडे पोत्यात चंदनाची तासलेली लहान-मोठी लाकडे आढळून आली. हे चंदन वाफळे गावातील शंकर दाडे व बिनू दाडे यांना विक्री करण्यास घेऊन जाणार असल्याचे सांगितले. त्या ठिकाणी पोलिसांनी पंचनामा करून त्यांच्याकडे दोन दुचाकी व पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिकच्या पिशवीत अंदाजे तीन लाख रुपये किमतीचे चंदन, वजन काटे असा एकूण एकूण ४ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

## मनुष्य जन्माचे कल्याण सदाचरण करण्यातच आहे : डॉ. मुळे

✔ सुराज्य/अक्कलकोट

प्रपंचात माणसाला एकही गोष्ट स्वबळावर करता येत नाहीत. सतत कोणी ना कोणी आधाराला मदतीला लागतो. यासाठी मी जेव्हा आम्ही होतो तेव्हाच स्वामी समर्थ होऊन परमार्थासाठी 'भिऊ नकोस मी सदैव पाठीशी आहे', याची प्रचिती देतात. म्हणून मनुष्य जन्माचे कल्याण सद्गुरु महिमा जाणून सदाचरण करण्यातच आहे, असे निरूपण औरंगाबाद येथील ह.भ.प. डॉ. सविता मुळे यांनी केले. श्री स्वामी समर्थांच्या १४५ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या धर्मसंकीर्तन महोत्सवातील सातवे पुष्प ह.भ.प. डॉ. सविता मुळे यांच्या सुश्राव्य कीर्तनाने गुंफले गेले, यावेळी निरूपण करताना मुळे बोलत होते.

मंदिर समितीच्यावतीने समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी डॉ. सविता मुळे यांचा सन्मान केला. प्रास्ताविक ओंकार पाठक यांनी केले. याप्रसंगी मोहनराव पुजारी, सचिव आत्माराम घाटगे, महेश गोगी, विपुल जाधव, बंडेराव घाटगे, भीमराव भोसेकर, दीपक जरीपटके, शिवशरण अचलेर, सुनील पवार, अमर पाटील, ज्ञानेश्वर भोसले, प्रकाश सुरवसे आदी उपस्थित होते.

## मोबाईल रेंज गायब होण्याच्या प्रकाराने चिखलीकर वैतागले

✔ सुराज्य/चिखली

मोहोळ तालुक्यातील चिखली, हिवरेसह अन्य परिसरात एअरटेल कंपनीसह अन्य मोबाइल कंपन्यांची रेंज सातत्याने गायब होत आहे. या प्रकाराने जवळपास पाच हजार मोबाईलधारकांसह सर्वसामान्य वैतागले आहेत.

या भागातील बहुतांश घरे ही मोबाईलनं जोडली आहेत. सकाळी सहापासून ते रात्री उशीरापर्यंत अनेक प्रकारच्या उलाढाली प्रामुख्याने मोबाईलवरुन होतात. त्यामुळे मोबाईल ग्राहकांची संख्या या भागात मोठ्या प्रमाणात आहे. या परिसरात बहुतांश कंपन्यांचे टॉवर देखील उभारण्यात आले आहेत. मात्र मोबाईलच्या अनेक कंपन्यांची पुरेशी



रेंजच मिळत नसल्याच्या ग्राहकांच्या तक्रारी पुढे येताहेत. घरातील लोकं बाहेर गावी गेले तर एकमेकांना संपर्क होणे मुश्कील आहे. एवढेच नव्हे येथील महावितरणच्या उपकेंद्रातील अधिकारी कर्मचारी यांच्याकडे सुध्दा एअरटेल कंपनीसह अन्य कंपनीचे मोबाईलधारक आहेत. त्यांच्या देखील मोबाईल फोनला रेंज येत नसल्याने वीजग्राहकांशी किंवा वीजग्राहकांचा महावितरण कर्मचारी अधिकारी त्यांच्याशी संपर्क होत नाही.

परिणामत: विजेअभावी समस्या निर्माण झाली तर निराकरण कोणाकडून करावं हे एक मोठे कोडेच आहे. यदाकदाचित गावात दुर्दैवी घटना घडल्यास सर्वच यंत्रणांना कसे पाचारण करावयाचे ही सुध्दा मोठी अडचण निर्माण झाली आहे. मोबाईल कंपन्या फायबर ऑप्टिकल केबल टाकून ग्राहकांना फोर जी सेवा देत आहेत. मात्र, बऱ्याचदा ४ जी नव्हे, तर ३ जी व २ जीचे नेटवर्क सेलफोनमध्ये दिसून येते.

### एका टॉवरवर चार कंपन्यांचा संसार

स्थानिक कर अथवा शासकीय महसूल बुडविण्यासाठी एकाच टॉवरवर तीन-चार कंपन्यांचा संसार सुरू आहे. मोबाईल कंपन्यांच्या रेंजबाबत वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत कोठेही तक्रार केली, तरी काही फरक पडत नाही. ऑनलाईन तक्रारींवर बेदखल आहे. एकणूच ग्राहक कोंडीत सापडलेल्या नागरिकांना मार्ग तरी कसा काढावा प्रश्न पडला आहे.

सुराज्य सोलापूर

Classified

पाहिजेत

गरजुंना कायमची कामाची व राहण्याखाण्याची सोय, लॉजमध्ये कायम राहणास कामगार पाहिजेत. मो.9373980171


(190423)

## वेळापुरात विविध ठिकाणी डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

✔ सुराज्य/वेळापूर

वेळापूर (ता. माळशिरस) बुद्धविहार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण जीवन जानकर यांच्या हस्ते करण्यात आले. पंचशील नगर येथे ध्वजारोहण व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. फुले शाहू-आंबेडकर नगर समाज मंदिर व तक्षशिला बौद्ध विहार येथे झेंडावंदन व प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

हनुमान नगर डिजे ग्रुप येथे उत्सव समितीच्यावतीने प्रतिमेचे पूजन सहा. पोलीस निरीक्षक निलेश बागाव, सरपंच रजनिश बनसोडे, जीवन जानकर, बाळासाहेब धाईंजे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी सरपंच रजनिश बनसोडे, माजी जि. प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, मिलिंद सरतापे, शिवाजी बनसोडे, जावेद मुलाणी, नितीन लोंढे, खंडू आडत, ग्रा. पं. सदस्य नानासो मुंगूसकर, हनुमंत वायदंडे, रविराज गायकवाड, शंकर आडत, अश्विनी भानवसे, दिलीप बनसोडे, शंकर आडत, जीवन वाघे, सुखदेव आडत, बनसोडे भाऊसाहेब, ॲड. निशांत लोंढे, रामा शेंडगे, गणेश साठे, विनायक भगत, विठ्ठल माने, राहुल सराटे, कार्यक्रमाचे आयोजक विजय बनसोडे, अजय बनसोडे, विशाल गायकवाड, भैय्यासाहेब बाबर, दादासो कांबळे, प्रशांत बनसोडे, रणजीत बनसोडे, रणजित सरवदे, गणेश धांडोरे, आकाश सरवदे, दादासो गालफाडे, आबा बनसोडे, आप्पा कांबळे, स्वप्निल सरवदे, राहुल गायकवाड, उमेश वाघमारे, भाऊसाहेब थोरात, संजय बनसोडे, अनिल खरे, किसन ओवाळ, राजेंद्र सरवदे, अशोक भोसले, रमेश लोंढे, रमेश बनसोडे, शशिकांत लोंढे, हर्षद बनसोडे, शंकर लोंढे, दगडू बनसोडे, सुयोग बनसोडे, अभिजित कचरे, अजित लोंढे, सर्जेराव जाधव, अमित धाईंजे, चैतन्य कांबळे, राजू थोरात, ओंकार सरतापे, नागेश काळुंखे, प्रशांत कांबळे आदी उपस्थित होते.

# खासगी बस दरीत कोसळून १३ जणांचा मृत्यू

✔ सुराज्य/पुणे

पुण्यासह राज्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा मोठा उत्साह पहायला मिळाला. अनेक ठिकाणी ढोल ताशांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यातच मुंबई हून पुण्याला गोरेगाव येथे ढोल ताशा पथक कार्यक्रम सादर करण्यासाठी आली असल्याची माहिती समोर आली आहे. पुण्यात रात्री त्यांनी कार्यक्रम साजरा केल्यानंतर त्यांचा संपूर्ण मुले आणि मुली एका खासगी बसने मध्यरात्री मुंबईकडे जाण्यासाठी निघाले. रस्ता रिकामा असल्याने वाहन चालक वेगाने गाडी चालवत असावा, लोणावळयाच्या पुढे आल्यानंतर बोर घाटामध्ये एका वळणावर पहाटे साधारण चार वाजण्याच्या दरम्यान बस चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस थेट दरीत जाऊन कोसळली. यामुळे साखरझोपेत असलेले सर्व मुला-मुलींना काही कळायच्या आत ही दुर्घटना घडली. त्यामुळे काही जणांना झोपेतच आपले प्राण सोडावे लागले. तर काहींना मदतीविना काही वेळ दरीतच थांबावे लागले. या घटनेने सर्वांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.







## मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांची मदत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची मोठी घोषणा




जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर शिंगरोबा मंदिराच्या मागे असलेल्या दरीत खासगी बस कोसळली. या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला आहे. बोरघाटातील शिंगरोबा मंदिरजवळ पहाटे ४च्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली. या अपघाताची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी केली. तसेच चौकशी केल्यानंतर मृतांच्या कुटुंबियांना ५ लाखांची मदत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले की, झालेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. खासगी बस घाटामध्ये पडून दुर्घटनाग्रस्त झाली. त्यामध्ये एकूण ४२ प्रवासी होते. परंतु त्यामधील १२ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. तर २८ जण जखमी आहे. त्याचप्रमाणे १ जण बेपत्ता आहे. सगळ्या जखमींची पाहणी केली आहे. पाच जण त्याच्यामध्ये अत्यंत गंभीर परिस्थितीत आहेत. त्यांच्यावर उपचार प्रक्रिया सुरू आहे. डॉक्टरांनाही योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु मृतांना आणि नातेवाईकांना शासनाच्या वतीने ५ लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

जे जखमी आहेत. त्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासनाच्यावतीने केला जाईल. त्यांना कुठलाही खर्च करावा लागणार नाही, अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतला आहे. या दुख:द घटनेची दखल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील घेतली. त्यांनी देखील संवेदना कळवल्या आहेत. जे बारा मृत झालेत त्यांच्या देखील नातेवाईकांच्या दुख:त आम्ही सहभागी आहोत. पुढील प्रक्रिया करण्याच्या तात्काळ सूचना देण्यात आल्या आहेत, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

## दरीतून बाहेर काढल्यानंतर लहान मुले तहानेने व्याकुळ, खूप गयावया करुनही ॲम्ब्युलन्समध्ये पाणी दिले नाही

हायकर्स ग्रुपमधील तरुण पहाटेच्या अंधारात दोरखंड लावून खाली दरीत उतरले. बसच्या जवळ गेल्यानंतर अनेकजण जखमी अवस्थेत पडले होते. जोरात आदळल्यामुळे बसचा चक्काचूर झाला होता, बसचे तुकडे वेगवेगळ्या ठिकाणी विखुरले गेले होते. जबर मार लागलेले प्रवाशी विव्हळत होते. प्रत्येकजण सुटकेसाठी जिवाच्या आकांताने ओरडत होता. हायकर्स ग्रुपमधील तरुणांनी सर्वप्रथम महिला आणि मुलांना वर नेण्यास सुरुवात केली. या अपघातामधून सुदैवाने बचावलेल्या काही लहान मुलांना सकाळी दरीतून वर काढण्यात आले. त्यानंतर रुग्णवाहिकेत बसले असतानाचा त्यांचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



या बसमध्ये प्रवास करणारे सर्व मुलं-मुली ही तिशीच्या आतमधील आहेत. प्रत्येक जण आपल्या घरासाठी काही तरी करता यावे यासाठी काम करतात, शिक्षण घेऊन हे वाजवण्याची कामे करतात. काही जणांवर आपल्या कुटुंबाची जबाबदारी असल्याची माहिती देखील जवळच्या नातेवाइकांनी दिली आहे. आपणही काही तरी करावे यासाठी या पथकत वाजवण्याची कामे करतात. या अपघाताने सेवा सामान्य घरातील मुलांचे मोठे नुकसान झाले असून ही हानी कधीही भरून न येणारी आहे.

अनेकांनी आपल्या मनाशी बाळगली स्वप्न अपूर्ण राहिल्याचा भावना मनाशी घर करून ठेवल्या. या पथकातून कुणाचा कॉलेजचा खर्च, कुणाचा घराला हातभार मिळत असे. मात्र, अचानक झालेल्या अपघातानं सर्वांनाच सुन्न केलं. आई वडिलांच्या हाताखाली आलेल्या मुलांना त्यांना डोळ्यादेखत पहावा लागलं. या अपघाताने राज्यासह देशातून हळहळ व्यक्त होत आहे.

### १५ ते २० प्रवासी अडकल्याची भीती

पुण्याहून मुंबईला ही बस निघाली होती, तेव्हा चालकाचा ताबा सुटल्याने अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. आतापर्यंत २५ जखमी प्रवाशांना बाहेर काढण्यात यश आलं आहे. आणखी आत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्याचं काम युद्धपातळीवर सुरु आहे. अद्याप १५ ते २० प्रवासी दरीत अडकल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान जखमी प्रवाशांना खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या बसमध्ये एकूण ४० ते ४५ प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. यातील ८ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

### पुण्याहून परत येताना अपघात

सध्या मदतकार्य सुरु आहे. जखमींना खोपोली ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात येत आहे.

घटनास्थळी अपघात ग्रस्तांच्या मदतीला हायकर्स ग्रुप, आयआरबी टीम दाखल झाली आहे खासगी रुग्णालयातील डॉक्टर्संनादेखील मदतीसाठी पाचारण करण्यात आले आहे. खासगी बसमध्ये बाजीप्रभू वादक गट गोरेगाव येथील असून पुण्याचा कार्यक्रम संपवून गोरेगाव येथे जात असताना ही दुर्घटना घडली. ही बस ४० ते ५० फूट खोल दरीत कोसळल्याची माहिती मिळाली आहे.

## पंतप्रधान मोदींनी व्यक्त केले दु:ख

या अपघाताबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दु:ख व्यक्त केले. त्यांनी ट्विटवरुन आपला शोकसंदेश प्रसिद्ध केला. महाराष्ट्रात रायगड येथे झालेल्या बस दुर्घटनेने व्यथित झालो आहे. या अपघातात ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत, त्यांच्या दु:खात मी सहभागी आहे. अपघातात जखमी झालेले लवकर बरे होतील अशी मी आशा व्यक्त करतो. अपघातग्रस्तांना राज्य सरकार शक्य ती सर्व मदत करत आहे. रायगड अपघातातील मयतांच्या कुटुंबीयांना पीएमएनआरएफमधून रु. २ लाख आणि जखमींना रु. ५०,००० अशी मदत पुरवण्यात येईल, अशी माहिती पंतप्रधान मोदी यांनी दिली.

---

## पुण्यात इंजिनिअर तरुणीला २५ लाखांचा गंडा

✔ सुराज्य/पुणे

**पुणे हा गुन्हेगारीचा अड्डा बनत चाललं आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. खून, दरोडे, भाईगिरीचं प्रमाण वाढत असताना आता सायबर गुन्ह्यांत देखील लक्षणीय वाढ झाली आहे. यामध्ये सेक्सस्ट्रोशन नंतर आता आर्थिक फसवणुकीचं प्रमाण वाढलं आहे. यात शिक्षित लोक अधिक बळी पडत असल्याचं निदर्शनास येत आहे. पुण्यातील एका इंजिनिअर तरुणीला तब्बल २५ लाखांचा गंडा सायबर भामट्यांनी घातला आहे.**

तुमच्या नावाने एक पार्सल असून ते मुंबईहून तैवान येथे पाठवलं जाणार आहे. त्यामध्ये १४० ग्रॅम एमडी नावाचा अंमली पदार्थ सापडला आहे. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यामध्ये तुमचं नाव आहे. आम्ही अंधेरी पोलीस ठाण्यातून बोलत आहोत असं सांगून पुण्यातील एका इंजिनिअर तरुणीला सायबर भामट्यांनी तब्बल २५ लाख ६१ हजार रुपयांचा गंडा घातला आहे. याप्रकरणी २९ वर्षीय इंजिनिअर तरुणीने सायबर पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. तरुणीच्या तक्रारीनंतर अपर्णा क्रिष्णा अय्यर, अजय कुमार बन्सल, भानसिंग राजपूत, पोलीस असल्याची बतावणी करणारे आणि बँक खातेधारक यांच्या विरोधात माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ११ एप्रिल रोजी घडली आहे.

## प्रकाश आंबेडकरांनी घेतली तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांची भेट

**नव्या राजकीय समीकरणांची चर्चा**

✔ सुराज्य/मुंबई



भारत राष्ट्र समिती पक्षाचे नेते, तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव आणि महाराष्ट्रातील वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यामध्ये आगामी निवडणुकांमध्ये आघाडीसाठी चर्चा होण्याची सूत्रांची माहिती आहे. आंबेडकर यांचे हैदराबाद येथे बीआरएस पक्षाच्या नेत्यांनी स्वागत केल्याचे वंचित आघाडीमधील नेत्यांनी सांगितले.

भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांपासून चार हात दूर राहून सशक्त राजकीय पर्याय देण्याचा तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचा प्रयत्न आहे. त्यासाठी त्यांनी नांदेडसह मराठवाडा भागात बीआरएस पक्षसंघटनेची बांधणी करण्यास सुरुवात केली आहे. याआधी के. चंद्रशेखर राव यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खा. राजू शेट्टी आणि माजी खा. छत्रपती संभाजीराजे यांचीही भेट घेतली आहे. आता आंबेडकर यांच्याशी आगामी आघाडीबाबत चर्चा करण्याची शक्यता असल्याचे समजते.

## माजी आमदारांसह १९ जणांना पाच वर्षांच्या शिक्षेसह दंड

✔ सुराज्य/नांदेड : आंदोलनावेळी वाहनांची तोडफोड करणे तत्कालीन शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना चांगलंच अंगलट आलं आहे. वाहनांची तोडफोड आणि शासकीय कामात अडथळा केल्या प्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माजी महिला आमदार आणि जिल्हा प्रमुखासह १९ जणांना नांदेड न्यायालयाने तब्बल पाच वर्षाची शिक्षा आणि प्रत्येकी एक लाख साठ हजार ७६० रुपयांचा दंड ठोठावला आहे. नांदेडचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. ई. बांगर यांनी मंगळवारी ही शिक्षा सुनावली आहे.

७ जून २००८ रोजी आमदार असलेल्या अनुसया खेडकर यांच्या नेतृत्वाखाली हिंगोली गेट परिसरात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात तत्कालीन जिल्हा प्रमुख दत्ता कोकाटे, भुजंग पाटील यांच्या अनेक आजी माजी पदाधिकारी सहभागी झाले होते.

या दरम्यान महापालिका आणि पोलिसांच्या दोन वाहनांसह चार एसटी बसेस वर दगडफेक देखील करण्यात आली. यात वाहनांचे मोठे नुकसान झाले होते.

तसेच दोन पोलीस अधिकारी जखमी झाले होते. या प्रकरणी वजीराबाद पोलीस ठाण्यात शासकिय कामात अडथळा आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्या प्रकरणी १९ जणां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## उपमुख्यमंत्री फडणवीस न्यायालयात हजर

✔ सुराज्य/मुंबई

**निवडणूक शपथपत्रामध्ये दोन गुन्ह्यांची माहिती लपविल्याप्रकरणी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवारी प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात हजर झाले. या प्रकरणावर पुढील सुनावणी येत्या ६ मे रोजी होणार आहे.**

२०१४ ला झालेल्या विधानसभा निवडणुकीसाठी दाखल केलेल्या शपथपत्रात दोन गुन्ह्यांची माहिती लपवली, असा आरोप ईडी प्रकरणातील आरोपी ॲड. सतीश उके यांनी केला आहे. या प्रकरणात फडणवीस यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी न्यायालयापुढे केली आहे.

१२५ अ लोकप्रतिनिधी कायद्यान्वये हा खटला दाखल करण्यात आला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यावर कलम ४२०, ४६७, ४६८ बदनामी, फसवणूक, कागदपत्रांमध्ये फेरफार करणे आदी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जे त्यांनी २०१४ च्या निवडणुकीमध्ये शपथपत्र सादर करताना निवडणूक आयोगापासून लपविले होते. १९९९-२००० मध्ये फडणवीसांनी या प्रकरणात जामीन मिळविला होता.

२०१९ च्या निवडणुकित अर्ज भरताना त्यांनी या प्रकरणांची माहिती दिली नाही. उके यांनी या विषयावर जेएमएफसी न्यायालयात याचिका दाखल करून फडणवीस यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश देण्याची विनंती केली होती. त्यामुळे या प्रकरणी नागपूर जिल्हा न्यायालयात देवेंद्र फडणवीस यांना शनिवारी १५ एप्रिल रोजी होणाऱ्या सुनावणीला उपस्थित राहावे लागले.

आपली बाजू मांडताना फडणवीस म्हणाले की, 'माझ्यावरील आरोप राजकिय द्वेशातून करण्यात आले आहेत. त्यामुळे या आरोपातून मुक्तता करण्यात यावी. या प्रकरणावर ६ मे रोजी सुनावणी होणार आहे.

# पाच जणांची हत्या करणाऱ्याला मरेपर्यंत फाशी

✔ सुराज्य/मुंबई

**एका रात्रीत पाच जणांची हत्या करून त्यांचे आयुष्य संपविणाऱ्या विवेक गुलाबराव पालटकरला जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश आर. एस. पावसकर यांनी मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली आहे.**

---

पाच वर्षांपूर्वी संपूर्ण राज्याला हादरवून सोडणाऱ्या पवनकर कुटुंबीय हत्याकांडप्रकरणातील आरोपी विवेक गुलाबराव पालटकरविरुद्ध यापूर्वीच दोषारोप सिद्ध झाले होते. अशा दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरणात आरोपीला फाशीची शिक्षा होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. यापूर्वी झालेल्या सुनावणीदरम्यान जिल्हा न्यायाधीश आर. एस. पावसकर यांच्यापुढे दोन्ही पक्षांनी फाशीवर युक्तिवाद केला होता. यात सरकारी पक्षाने हे प्रकरण दुर्मिळात दुर्मिळ असून विवेकला फाशीच का दिली जावी, हे पटवून देण्यासाठी युक्तिवाद केला. तसेच बचावपक्षाने, त्याला फाशी दिली जाऊ नये, हे पटवून देण्यासाठी युक्तिवाद केला.

दोन्ही पक्षांच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने नियमानुसार, आरोपीला फाशी द्यावी की नाही, यावरील मत जाणून घेतले. यावेळी 'मला त्वरित संपवा, मला फाशी द्या, मला आता जगण्याची इच्छा नाही' असे मत त्याने न्यायालयासमोर मांडले होते. शनिवारी, १५ एप्रिल रोजी न्यायालयाने या प्रकरणी निर्णय दिला. सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील अभय जिकार यांनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड. मोहम्मद अतिक यांनी सहकार्य केले.

थरारक घटना

मृत कमलाकर पवनकर हा आरोपी विवेक पालटकरचा मेहुणा होता. पालटकरची उच्च न्यायालयाने त्याच्या पत्नीच्या हत्येतील प्रकरणातून सुटका केली होती. या सर्व कायदेशीर प्रक्रियेसाठीचा आर्थिक खर्च पवनकर यांनी केला होता. पुढे कमलाकर आणि विवेक यांच्यात पैसा आणि हिस्स्यावरून वाद झाले.

१० जून २०१८ रोजी रात्री ९.३० ते १० वाजतादरम्यान विवेक हा कमलाकर यांच्या घरी रात्रीच्या मुक्कामाने आला. सर्व जण झोपलेले असताना विवेकने रात्री तीनच्या सुमारास लोखंडी सब्बलने एकापाठोपाठ एक घरातील पाचही सदस्यांच्या डोक्यावर प्रहार करून त्यांची हत्या केली.

मृतांमध्ये कमलाकर मोतीराम पवनकर (वय ४८), त्यांच्या पत्नी अर्चना (वय ४५), आई मीराबाई (वय ७३), मुलगी वेदांती कमलाकर पवनकर (वय १२) व भाचा कृष्णा ऊर्फ गणेश विवेक पालटकर (वय ५) यांचा समावेश होता. यातून विवेकची मुलगी वैष्णवी (वय ७) व मिताली कमलाकर पवनकर (वय ९) या दोघी बचावल्या होत्या. पोलिसांनी विवेकला अटक केली. या पोलीस निरीक्षक मुकुंद साळुंके यांनी तपासाअंती न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.



## १३ भाषेत होणार सीएपीएफची परीक्षा

✔ सुराज्य/नवी दिल्ली : केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (सीएपीएफ) कॉन्स्टेबल भरती परीक्षा मराठी, कोंकणीसह अन्य १३ भाषांमध्ये होणार आहे. ही परीक्षा आधी इंग्रजी आणि हिंदी भाषेत होत होती. स्थानिक तरुणांना या भरती प्रक्रियेत सहभागी होता यावे, प्रादेशिक भाषांना प्रोत्साहन देता यावे यासाठी मोदी सरकारने हा निर्णय घेतला आहे. केंद्रीय नोकर भरती परीक्षा केवळ हिंदी आणि इंग्रजी भाषेत होतात, यावर तामिळनाडू व तेलंगणा सरकारने आक्षेप घेतला होता.

## राज्यात २ दिवसांची टोलमाफी

✔ सुराज्य/मुंबई : ज्येष्ठ समाजसेवक आणि निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र शासनाच्यावतीने 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोहळा येत्या १६ एप्रिल रोजी नवी मुंबईतील खारघर येथील सेंट्रल पार्क मैदानावर पार पडणार आहे. तसेच या सोहळ्याला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह देखील उपस्थिती लावणार आहेत. मात्र, मुंबईतून येणाऱ्या आणि जाणाऱ्या वाहनांसाठी राज्यात २ दिवसांची टोलमाफी देण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रादेशिक विभाग आणि सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांच्या माध्यमातून घेण्यात आला आहे.




# इंडियन प्रिमियर लीग इंडियन पैसा लीग



**आयपीएल अर्थात इंडियन प्रिमियर लीग ही जगातील सर्वाधिक पाहिली जाणारी लीग आहे. भव्यदिव्य आयोजन, रंगारंग स्वरूप, प्रचंड खर्च, अमाप लोकप्रियता, अफाट गर्दी इत्यादी कारणांमुळे पहिल्या सिझनपासून संपूर्ण जगाला मोहिनी घातलेल्या या इंडियन प्रिमियर लीगला दुसऱ्या भाषेत इंडियन पैसा लीग असे म्हटले जाते. या लीगमुळे अनेक खेळाडू उदयास आले आणि झटपट श्रीमंतही झाले. अनेक गुणी व मौल्यवान खेळाडू या लीगमुळे जागतिक क्रिकेट विश्वाला मिळाले. अशी लीग जगामध्ये इतर देशांमध्येही खेळली जाते. मात्र इंडियन क्रिकेट लीग अर्थात आयपीएलने जे जगात स्थान मिळवले आहे; ते अन्य कोणत्याही क्रिकेट लीगला मिळाले नाही. सध्या आयपीएलचा सोळावा सिझन चालू आहे. संपूर्ण देश आपीएलमय झाला आहे. या पार्श्वभूमीवर आयपीएलची संपूर्ण कुंडली खास 'सुराज्य'च्या वाचकांसाठी संडे मॉर्निंग या सदरातून देत आहोत. इंडियन क्रिकेट लीग (आयसीएल) ची स्थापना २००७ मध्ये झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेसच्या मदतीने करण्यात आली होती. आयसीएलला भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) किंवा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) द्वारे मान्यता मिळाली नाही. म्हणून खेळाडूंना आयसीएलमध्ये सामील होण्यापासून रोखण्यासाठी, बीसीसीआयने त्यांच्या देशांतर्गत स्पर्धांमध्ये बक्षिसाची रक्कम वाढवली आणि आयसीएलमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंवर आजीवन बंदी घातली. अर्थात आयसीएलला बोर्डाने बंडखोर लीग असे संबोधले होते.**

## इंडियन प्रिमियर लीग (आयपीएल)




सन २००७ मध्ये भारताने टी २० विश्वचषक आपल्या नावावर केला. त्यानंतर दि.१३ सप्टेंबर २००७ रोजी बीसीसीआयने इंडियन प्रिमियर लीग नावाच्या फ्रँचायजी-आधारित ट्वेंटी२० क्रिकेट स्पर्धेची घोषणा केली. पहिला सिझन एप्रिल २००८ मध्ये नवी दिल्ली येथे एका भव्यदिव्य समारंभात केला. आयपीएलचे नेतृत्व करणारे बीसीसीआयचे उपाध्यक्ष ललित मोदी यांनी स्पर्धेचे स्वरूप, बक्षिसाची रक्कम, फ्रँचायजी पध्दत आणि संघ रचना, नियमांसह स्पर्धेचा तपशील सांगितला. भारताचे माजी खेळाडू आणि बीसीसीआय अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या सात सदस्यांची गव्हर्निंग कौन्सिलद्वारे आयपीएल चालवणार होती.सुरुवातीला बेंगलोर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, राजस्थान, कोलकाता, पंजाब आणि मुंबई संघांचा यामध्ये समावेश होता.

## आयपीएल सामने



आयपीएलमध्ये विविध राज्यांमध्ये टी-२० चे क्रिकेट सामने खेळवले जातात. यामध्ये भारतीय खेळाडूंबरोबरच इतर देशातील खेळाडूंचा समावेश असतो. या क्रिकेट लीगमध्ये भाग घेणारे खेळाडू ज्या राज्याच्या अथवा शहराच्या संघात खेळतात, ते खेळाडू त्या राज्याचे अथवा शहराचे प्रतिनिधित्व करतात. या लीगच्या शेवटी जो संघ विजयी होतो, त्याला आयपीएल ट्रॉफी व बक्षीस दिले जाते.

## आयपीएल मॅच फॉरमॅट



आयपीएलमध्ये भाग घेणाऱ्या प्रत्येक टीमला दुसऱ्या संघासोबत दोन सामने खेळावे लागतात आणि त्यामध्ये 'टॉप चार' मध्ये येणारे संघ 'प्लेऑफ'साठी क्वालिफाय होतात. प्लेऑफमधील दोन संघामध्ये फायनलसाठी सामने खेळले जातात. यामध्ये विजयी होणारा संघ फायनलमध्ये प्रवेश करतो. हरलेल्या संघाला फायनलमध्ये आपली जागा बनवण्यासाठी पुन्हा एक संधी दिली जाते आणि हा संघ दुसरा क्वालिफायर तिसऱ्या व चौथ्या नंबरच्या संघातील जिंकलेल्या संघाशी खेळतो. या दुसऱ्या क्वालिफायरमधील विजयी संघ फायनलमध्ये प्रवेश करतो.

## आयपीएल लिलाव



आयपीएल लिलावादरम्यान, लिलावकर्ता खेळाडूच्या नावाची घोषणा करतो. त्यानंतर संघ त्या खेळाडूच्या आधारभूत किमतीनुसार बोली लावतात. समजा एखाद्या खेळाडूची मूळ किंमत १ किंवा २ कोटी रुपये असेल तर त्या खेळाडूची पहिली बोली १ किंवा २ कोटी रुपयांपासून सुरू होते. यानंतर, इतर संघांच्या बोलीमुळे त्या खेळाडूची किंमत वाढते. कोणताही संघ खेळाडूच्या आधारभूत किमतीवर खेळाडू खरेदी करू शकतो. खेळाडूसाठी सर्वाधिक बोली लावल्यानंतर, लिलावकर्ता सर्व संघांना खेळाडूवर लावलेल्या शेवटच्या बोलीबद्दल तीन वेळा सूचित करून आणि कोणत्याही संघाने स्वारस्य न दाखविल्यास त्याची विक्री करून लिलाव प्रक्रिया पूर्ण करतो. जो संघ सर्वाधिक किंवा शेवटची बोली लावतो तो खेळाडू विकत घेतो आणि त्याच्या संघात सामील होतो.



**ऑरेंज कॅप व पर्पल कॅप :** आयपीएलच्या प्रत्येक सिझनमध्ये सर्वात जास्त धावा काढणाऱ्या खेळाडूला ऑरेंज कॅप तर सर्वात जास्त बळी घेणाऱ्या खेळाडूला पर्पल कॅप दिली जाते. आयपीएल संपल्यावर संबंधित खेळाडूकडेच ती कॅप राहते.

**भरपूर कमाई :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आयपीएलचे संचालन करते आणि या दोघांच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा स्रोत मीडिया आणि प्रसारण आहे. आयपीएल फ्रँचायजी त्यांचे मीडिया हक्क आणि प्रसारण हक्क विकून जास्तीत जास्त पैसे कमवतात. सुरुवातीला बीसीसीआय प्रसारण अधिकारातून मिळणाऱ्या कमाईपैकी २० टक्के रक्कम ठेवत असे आणि ८० टक्के रक्कम संघांना मिळत असे. पण हळूहळू हा वाटा ५०-५० टक्क्यांपर्यंत वाढला.


**जाहिरातबाजीतून पैसा :** आयपीएल मीडिया ब्रॉडकास्टचे हक्क विकण्यासोबतच फ्रँचायजी जाहिरातींमधूनही भरपूर पैसे कमावतात. खेळाडूंच्या टोप्या, जर्सी आणि हेल्मेटवर दिसणाऱ्या कंपन्यांची नावे आणि लोगोसाठी कंपन्या फ्रँचायजींना खूप पैसे देतात. आयपीएल दरम्यान, फ्रँचायजींचे खेळाडू अनेक प्रकारचे जाहिराती शूट करतात. यातून कमाईही केली जाते. एकूणच, जाहिरातीमुळे आयपीएल संघांनाही भरपूर पैसा मिळतो.

**तीन प्रकारे कमाई :** आयपीएल संघांची कमाई तीन भागांमध्ये विभागली गेली आहे, केंद्रीय महसूल, प्रमोशनल महसूल आणि स्थानिक महसूल. माध्यम प्रसारण हक्क आणि शीर्षक प्रायोजकत्व फक्त केंद्रीय महसुलात येतात. संघांची सुमारे ६० ते ७० टक्के कमाई यातून येते. दुसरे म्हणजे जाहिरात आणि जाहिरातींचे उत्पन्न. यातून संघांना २० ते ३० टक्के उत्पन्न मिळते. त्याचवेळी, संघांच्या कमाईच्या १० टक्के स्थानिक महसुलातून येतात. यामध्ये तिकीट विक्री आणि इतर गोष्टींचा समावेश आहे. प्रत्येक हंगामात ७-८ घरगुती सामन्यांसह, फ्रँचायजी मालक अंदाजे ८० टक्के कमाई तिकीट विक्रीतून ठेवतो. उर्वरित २० टक्के बीसीसीआय आणि प्रायोजकांमध्ये विभागले गेले आहेत. तिकीट विक्रीतून मिळणारे उत्पन्न हे संघाच्या कमाईच्या १०-१५ टक्के असते.

**आयपीएल आणि सट्टेबाजी :** ज्या प्रकार खेळाडू आणि फ्रँचायजी आयपीएलमधून सरळ सरळ पैसे कमवतात; त्याचपध्दतीने दुसऱ्या बाजूला आयपीएलवर सट्टा लावून अनेक सट्टेबाज पैसे कमवतात. या सट्टेबाजांची मजल इतकी दूरपर्यंत गेली आहे की ते थेट मॅचच फिक्स करू लागले आहेत. असे प्रकार यापूर्वीही उघडकीस आले आहेत. त्यामुळे सट्टेबाजी हा क्रिकेटला लागलेला कलंक आहे. सट्टेबाजीमध्ये बुकीकडे पहिल्यांदा विशिष्ट रक्कम जमा करून त्यानंतर प्रत्येक बॉलनुसार सट्टा लावला जातो. हा सट्टा लाखांच्या घरात असतो. पुढे काय होणार आहे हे ओळखून पैसे लावले जातात. जसे अपेक्षीत असते तसे नाही घडले तर पैसे जातात. सुदैवाने तसेच घडले तरच पैसे मिळतात. सट्टा कायद्याने गुन्हा असल्यामुळे हा प्रकार अत्यंत गोपनीय पध्दतीने चालतो. त्यामुळे जसा आयपीएलमधून पैसा कमवला जातो, तसा सट्टाबाजारातूनही पैसा कमवला जातो.

**आयपीएल ट्रॉफीवर संस्कृत श्लोक :** आयपीएल ट्रॉफीचा रंग सोनेरी असून ती सोने आणि हिऱ्यापासून बनवलेली असते; असे सांगितले जाते. या ट्रॉफीवर 'यत्र प्रतिभा अवसरा प्राप्नोतिही' असा संस्कृत श्लोक लिहिलेला असतो. या श्लोकातून स्पर्धेचा उद्देश स्पष्ट केला गेला आहे. 'प्रतिभा आणि संधी यांचा संगम' असा या श्लोकाचा मराठी अर्थ असून आयपीएलशी हा श्लोक सुसंगत झालेला आहे. याशिवाय ट्रॉफीवर आतापर्यंत विजेतेपदे पटकावलेल्या सर्व संघांची नावेसुध्दा लिहिलेली आहेत.

## खेळाडू घेण्याची पध्दत



कोणत्याही टीमची फ्रँचायजी तीन प्रकारे खेळाडू घेतात. पहिला प्रकार आहे लिलावाचा. लिलावात बोली लावून खेळाडू घेता येतात. दुसरा ट्रेडिंग विंडोचा आहे. यामध्ये एक संघाला दुसऱ्या संघासोबत खेळाडू एक्स्चेंज करता येतात. तिसरा प्रकार अनुपलब्ध खेळाडूंसाठी प्रतिस्थापनेवर दुसरे खेळाडू घेणे.

## खेळाडूंचे वाटप




लिलावातील खेळाडूंना इंडियन कॅप्ड, इंडियन अनकॅप्ड आणि परदेशी खेळाडू अशा तीन श्रेणीमध्ये विभागला जाते. या खेळाडूंना नंतर गोलंदाज, वेगवान गोलंदाज, फिरकी गोलंदाज, अष्टपैलू आणि यष्टिरक्षक अशा त्यांच्या वैशिष्ट्यांच्या आधारे वेगवेगळ्या लॉटमध्ये ठेवले जाते. ज्या खेळाडूने आत्तापर्यंत आपल्या देशासाठी एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही त्याला अनकॅप्ड म्हणतात.

## खेळाडूंची आधारभूत किंमत



लिलावापूर्वी खेळाडू आधारभूत किंमत ठरवतो आणि ती बीसीसीआयला सादर करतो.कॅप्ड भारतीय खेळाडू आणि परदेशी खेळाडू, सर्वसाधारणपणे, त्यांची मूळ किंमत जास्त ठेवतात, कारण त्यांना लिलावात जास्त किंमत मिळण्याची अपेक्षा असते. दुसरीकडे, अनकॅप्ड आणि कमी प्रसिद्ध खेळाडू त्यांच्या मूळ किमती तुलनेने कमी ठेवतात. आधारभूत किंमत ठरवताना खेळाडू त्यांची मागील कामगिरी, त्यांची लोकप्रियता, सोशल मीडिया फॉलोअर्स इत्यादी गोष्टी विचारात घेतात.

## खेळाडू रिटेन करणे



कोणतीही फ्रँचायजी लिलाव सुरू होण्याआधी आपल्या संघाचे जास्तीत जास्त तीन खेळाडू आपल्या संघात राखून ठेवू शकते. यामुळे लिलावा दरम्यान रिटेन केलेल्या खेळाडूंची बोली लागत नाही. आपल्या टीममधील महत्त्वाचे खेळाडू आपल्या टीममध्येच रहावे, यासाठी रिटेनचा वापर केला जातो. पण त्या खेळाडूला रिटेन करायचा की नाही हे त्या फ्रँचायजीवर अवलंबून असते.रिटेन केलेल्या खेळाडूच्या किमतीएवढी रक्कम लिलावासाठी निश्चित केलेल्या रकमेतून कमी होते.


संकलन व संपादन : राजकुमार नरुटे | मांडणी व सजावट : अभिषेक उघडे